अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

धनत्रयोदशी निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!

शुभ दीवाली

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २२ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : २५ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# दीपोत्सवाचे 'राज'कारण, ईडी सरकारने केले अनावरण

## ■ तीन पक्षांचा 'संस्कृती'संगम, राज्याने पाहिले दृश्य विहंगम

✔ सुराज्य/सोलापूर

**राजकारणात कोण कोणाचा दीर्घकाळ मित्र किंवा शत्रू नसतो. कालचा विरोधक आज समर्थक होऊ शकतो. त्याला 'राजकीय संस्कृती' असे म्हणतात. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीच्या निमित्ताने पवार-शिंदे-फडणवीस यांच्या संगमाची संस्कृती पाहिल्याच्या दुसऱ्याच दिवशी ठाकरे-शिंदे-फडणवीस यांच्या मिलनाची दुसरी संस्कृती महाराष्ट्राला पहायला मिळाली. संस्कृतीमध्ये 'राज'कारण पाहू नका असे म्हणत ई-डी सरकारने ठाकरेंच्या दीपोत्सवाचे अनावरण केले. तीन पक्षांचा हा 'संस्कृती'संगम आणि त्याचे विहंगम दृश्य राज्याने पुन्हा एकदा पाहिले.**



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे प्रमुख राज ठाकरे हे तीन दिग्गज नेते शुक्रवारी एकत्र आले. निमित्त होते दादरच्या शिवाजी पार्क मैदानावर मनसेने आयोजीत केलेल्या दीपोत्सवाचे.

मागील दहा वर्षांपासून शिवाजी पार्क मैदानावर मनसेतर्फे दीपोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. मात्र, यंदाचा दीपोत्सव विशेष ठरला तो एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमुळे. महाराष्ट्रात पुन्हा नव्या महायुतीची नांदी पहायला मिळेल अशी चर्चा या निमित्ताने रंगली आहे.

### ■ पूर्वी एकत्र... सध्या तिघांची तोंडे तीन दिशेला

पूर्वी सेना-भाजपची युती होती. त्यावेळी ठाकरे कुटुंबीय आणि भाजपनेते एकत्र बसायचे. नंतर राज हे शिवसेनेतून बाहेर पडले. ठाकरे कुटुंबात फूट पडली. राज कधी भाजपवर तर कधी शिवसेनेवर टीका करत दोघांपासून समान अंतरावर राहिले. नंतर युती तुटली. आता शिवसेनाही फुटली. त्यामुळे पूर्वी एकत्र असलेले ठाकरे-फडणवीस दुरावले. सेना फुटल्यामुळे ठाकरे-शिंदे दूर गेले. उध्दव-राज यांच्यातून विस्तवसुध्दा जाईना. पण दीपोत्सवाच्या निमित्ताने उध्दव नसले तरी राज, शिंदे, फडणवीस एकत्र आले.

### ■ म्हणे राजकीय अर्थ काढण्याचा अनर्थ नको

सेना फुटल्यापासून एकनाथ शिंदे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांची जवळीक वाढली आहे. दुसरीकडे फडणवीस-राज यांच्यातील दुरावासुध्दा संपला आहे. त्यातूनच फडणवीस, शिंदे आणि राज ठाकरे यांच्या एकमेकांच्या निवासस्थानी होणाऱ्या भेटीगाठी वाढल्या आहेत. यातूनच काही राजकीय निर्णयसुध्दा झाले आहेत. तरीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतात, या भेटीचा कोणी राजकीय अर्थ काढू नये. एकमेकांच्या विरोधातील राजकारण्यांच्या भेटीला राजकीय अर्थ असतोच, हे महाराष्ट्राने पुन्हा एकदा पाहिले.

### ■ विरोधकाचा विरोधक हा आपला समर्थक

सध्या उध्दव ठाकरे आणि फडणवीस हे एकमेकांचे विरोधक आहेत. दुसरीकडे एकनाथ शिंदे आणि उध्दव ठाकरे हे एकमेकांचे विरोधक आहेत. तिसरीकडे राज ठाकरे आणि उध्दव ठाकरे हेसुध्दा एकमेकांचे राजकीय विरोधक आहेत. यात एका उध्दव ठाकरे यांचे अन्य तिघेही विरोधक आहेत. हे तिन्ही विरोधक एकत्र आले तरी त्यात उध्दव ठाकरेंच्या विरोधात खिचडी शिजणार नाही असे होणारच नाही. म्हणजेच विरोधकाचा विरोधक हा आपला समर्थक असतो; हाच विचार राज-शिंदे-फडणवीस यांनी केल्याचे राज्याने पाहिले.


# सोलापूर रेल्वे स्टेशनवरील वेटिंग रूममध्ये तरुणीचा राडा

## खिडक्यांच्या काचा व टेबलाची केली मोडतोड

✔ सुराज्य/सोलापूर

शुक्रवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास सोलापूर रेल्वे स्टेशनवरील उच्च क्लास वेटिंग रूम मध्ये घुसून एका १९ वर्षीय तरुणीने धिंगाणा घालत वेटिंग रूमच्या खिडक्यांच्या काचा,टेबल खुर्च्यांची मोडतोड केली.हा संपूर्ण थरार अनेकांनी मोबाईल मध्ये कैद केला. परंतु कोणीही तिला त्यापासून परावृत्त होण्याकरिता धजावले नाही.

सोलापूर रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर वरील उच्च श्रेणी वेटिंग रूम आहे.येथे वेटिंग रूम मध्ये येणाऱ्या जाणाऱ्या प्रवासांची नोंद करणारे जमीर महबूब खान हे ड्युटीवर असताना पहाटे पाच वाजण्या सुमारास ही अनोळखी तरुणी विना तिकिट प्लॅटफॉर्मवर आली.येथे आल्यानंतर तिने जवळच असलेल्या उच्च श्रेणी वेटिंग रूममध्ये प्रवेश केला.त्यावेळी खान यांनी तिला तिकिटाची



मागणी करत या रूममधून बाहेर जाण्यास सांगितले असता उलट त्या मुलींनी खान यास आरवाच भाषेत शिवीगाळ करत वेटिंग रूम मधील बाथरूम मध्ये जाऊन तिने आतून कडी लावून घेतली. ही गोष्ट खान यांनी जवळच ड्युटीवर असलेले आरपीएफ चे पोलीस जवान व पोलीस कर्मचारी यांना सांगून त्यांना त्या ठिकाणी बोलावून घेतले.

या तिघांनी त्या मुलीला दरवाजा उघडण्यास सांगितले असता,त्या माथेफिरू तरुणीने सुरुवातीने आरडा ओरडा करत नकार दिला.नंतर तिने दरवाजा उघडून जवळच असलेल्या टेबलवर चढून खिडकीची काच फोडली.हातात येईल त्या वस्तूने तिने दरवाजाची तसं तसेच इतर खिडक्यांच्या काचा फोडल्या. तसेच टेबल व खुर्च्यांची तोडफोड केली. यामुळे प्लॅटफॉर्मवर प्रवासात घबराट निर्माण झाली. उपस्थित कर्मचारी पोलीस कर्मचारी तिला खूप समजावण्याचा प्रयत्न केला असता, उलट तीच त्यांच्या अंगावर शिवीगाळ करत धावून येत होती. काही वेळाने उपस्थित एका पॅसेंजरने तिला पाठीमागून जाऊन पकडले.

आरपीएफ पोलिसांच्या ताब्यात दिले. लोहमार्ग पोलीस ठाण्यात तिला आणल्यानंतर त्या मुलीने आपले नाव राजनंदिनी तानाजी साठे (वय-१९, रा. दमाणीनगर सोलापूर) असे असल्याचे सांगितले आहे. पोलिसांनी तिच्या आई-वडिलांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतले. रेल्वेच्या संपत्तीचे नुकसान केल्याप्रकरणी जमीर खान यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे.पोलीस प्रशासनाने तिला तिच्या आई वडिलांच्या ताब्यात दिली आहे.

# मार्केट यार्डसमोर अपघात; दोघे जखमी




✔ सुराज्य/सोलापूर

मार्केट यार्ड येथे झालेल्या अपघातात दोनजण जखमी झाल्याची घटना दि.१९ ऑक्टोंबर रोजी रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी विष्णू रामप्रसाद खाटोप (वय-५०,रा.मु.पो.जयसिंगपूर, जिल्हा कोल्हापूर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादीवरून शहाजी ज्ञानेश्वर व्यवहारे (वय-५०,रा.करकम ता.पंढरपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी व त्यांचे चालक असे मिळून कार क्रमांक एम.एच.०९.डीएक्स.२५७३ यातून जात असताना समोरून येणारा बलकर वाहन क्रमांक एम.एच.१२.एसएक्स.११७१ यातील चालक त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने व हयगयीने चालून फिर्यादी यांच्या कारला धडक देऊन फरफटत नेले.

त्यात फिर्यादी व चालक जखमी होऊन कारचे नुकसान झाले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा तपास पोलीस नाईक कसबे हे करीत आहेत.



**दिन दिन दिवाळी गायी म्हशी ओवाळी...!**

दिवाळीचा पहिला दिवस... वसुबारसनिमित्त ग्रामीण भागात आजच्या दिवशी गाय व वासराला औक्षण करून बाजरीची भाकरी व गवारीची भाजी नैवेद्य दाखवून गायीला खायला घालतात.ग्रामीण भागात आज ही मोठ्या उत्साहात वसूबारस सण साजरा केला जातो.माळशिरस तालुक्यातील चौंडेश्वरवाडी येथील शेतकरी प्रवीण दुर्योधन किर्दकर गायीच्या गोठ्यात गाय वासरूच्या पूजनाचे टिपलेले छायाचित्र...

# सासरकडून विवाहितेचा छळ ; पाच जणांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

विवाहात मानपान केला नाही, कमी हुंडा दिला, मूलबाळ होत नाही, या कारणातून पाच जणांनी छळ केला. तसेच लक्ष्मण भिमशा आलुरे यांनी संशयित आरोपी रविकांत लक्ष्मण आलुरे,तिपण्णा लक्ष्मण आलुरे व कलावती तिपण्णा आलुरे यांना फिर्यादी सुप्रिया रविकांत आलुरे (रा. वडकबाळ, ता.दक्षिण सोलापूर) यांना मारण्यास प्रोत्साहित करून मी बोरगावचा पोलीस पाटील असून तुला बघून घेईन म्हणून दमदाटी केली. सुप्रिया आलुरे यांच्या फिर्यादीनुसार ८ मार्च २०२०पासून आजपर्यंत सासरच्यांनी त्रास दिला, अशी फिर्याद त्यांनी जोडभावी पेठ पोलिसांत दिली. त्यानुसार रविकांत आलुरे, तिपण्णा आलुरे, कलावती आलुरे, लक्ष्मण भिमशा आलुरे, संजय अमृत बनजगोळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पोलीस हवालदार दुधाळ तपास करीत आहेत.



# व्याजाच्या पैशावरून जीवे मारण्याचा प्रयत्न; तिघांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

व्याजाच्या पैशावरून दोरीने गळा आवळून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी तिघा जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.१८ ऑक्टोबर रोजी रात्री सात ते साडे आठ वाजण्याच्या दरम्यान हॉटेल बनशंकरी येथील सेंटर कारखान्यासमोरील जंगलामध्ये घडली. याप्रकरणी नरेश नागनाथ सब्बल (वय-३१,रा. गंगा चौक निलम नगर भाग-३, सध्या- मधुकर लक्ष्मण पून्नम यांच्या घरी भाड्याने) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मिकि ऊर्फ आशुतोष दंडी, सुनील दाते, रुपेश आवारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी नरेश यांच्या मित्रास व्यंकटेश याला फिर्यादीने मध्यस्थी करून आशुतोष दंडी यांच्याकडून व्याजाने ५ हजार रुपये घेऊन दिले होते.व्याजाने घेतलेले पैसे वेळेवर परत न केल्याच्या कारणावरून वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी नरेश यांना जबरदस्तीने बनशंकरी हॉटेल जवळील कारखान्यासमोर बोलून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर दोरीने फिर्यादी यांचा गळा आवळून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पेटकर हे करीत आहेत.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सत्तेचा फराळ आपणच संपवायचा!

कल्याण
279-83-355

मेन बाजार
257-42-147

## पालिकेच्या दिरंगाईचा मक्तेदारांना फटका;

# ११ कोटींची बिले थकली, दिवाळी अंधारातच

✔ **सोलापूर** : दिवाळी सणासाठी बिल अदा करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले असताना झालेल्या दफ्तर दिरंगाईमुळे पालिकेच्या सुमारे तीनशे मक्तेदारांची अकरा कोटींची बिले रखडली आहेत.

पालिका प्रशासनकडून वाटपास विलंब झाल्याने अकरा कोटींच्या वरील रक्कम वाटप करणारा सक्षम अधिकारी नसल्यामुळे बिलाचे वाटप करण्यास बँकांनी नकार दिल्यामुळे परिणामी पालिकेच्या सुमारे तीनशे मक्तेदार आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या सर्व कामगार वर्गाची यंदाची दिवाळी अंधारात आहे. पालिकेत लहान मोठे काम करणारे नोंदणीकृत सुमारे तीनशे मक्तेदार आहे. या मक्तेदारांनी केलेल्या कामाची बिले पालिका प्रशासनास सादर केली आहेत. दिवाळी सणामध्ये बिल मिळावे, अशी मागणी मक्तेदार संघटनेने पालिका आयुक्तांकडे केली होती. त्यानुसार तब्बल तीनशे मक्तेदारांची यादी तयार करून अकरा कोटींची बिले अदा केली जाणार होती. पालिका आयुक्तांनी २० तारखेच्या आत यादी तयार करून निधी बँकेत वर्ग करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार मक्तेदार संघटनेने पाठपुरवा केला. मात्र पालिका प्रशासनाच्या दफ्तर दिरंगाईमुळे यादी तयार करण्यास विलंब लागला. याचा नाहक फटका मक्तेदार आणि त्याकडे काम करणाऱ्या मोलमजूर, गरीब कामगारांना बसला आहे.

कामाचे बिल न मिळाल्यामुळे कामगारांना दिवाळी सणासाठी पगार कोठून द्यायचा, असा गहन प्रश्न मक्तेदारांसमोर उभा राहिला आहे. वास्तविक पाहता वेळेत बिल मिळाले असते तर कामगारांचा पगार करता आला असता मात्र यादी तयार करून बँकेत जमा करण्यासाठी गेल्यानंतर अकरा कोटींचे वाटप करणारा सक्षम अधिकारी नसल्याने ही बिले वाटपास बँकाच्या अधिकाऱ्यांनी नकार दिला. त्यामध्ये बँकांना सलग सुट्या असल्याने आता या गरिब कामगारांच्या पगाराला पैसे कोठून आणायचे हा प्रश्न असल्याचे मक्तेदार संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे यंदाची दिवाळी अंधारात जाणार असल्याचे काही मक्तेदारांचे म्हणणे आहे.

**वादावादी होण्याची शक्यता :** पगारासाठी कामगार पाठपुरवा करत आहे. दिवाळी चालू झाली आहे. पगार नाही दिला तर कामगार आणि आमच्यामध्ये वाद होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने वेळेत बिल अदा केले असते तर ही वेळ आली नसती, असे मत पालिकेच्या एका मक्तेदारांनी व्यक्त केले.

**कामगारांच्या परिवाराचे काय? :** पालिकेचे जवळपास तीनशे मक्तेदारांकडे एक हजार कामगार आहेत. या एक हजार कामगारांच्या पगारावर चार ते पाच जणांचा परिवार आहे. आत दिवाळीत लवकर पगार नाही मिळाला तर या सर्वांची दिवाळी काळी होणार आहे. याला जबाबदार कोण असा सवाल देखील मक्तेदार उपस्थित करत आहेत.

# ब्रिटनची अस्थिरता

जगात 'लोकशाहीची जननी' म्हणून ज्या देशाची अस्सल ओळख आहे, त्या ब्रिटन अर्थात इंग्लंडच्या राजसत्तेत काही दिवसात अस्थिरता निर्माण व्हावी, याचे साऱ्या विश्वाला आश्चर्य वाटत असावे. अवघ्या काही दिवसांपूर्वी पंतप्रधानपदावर विराजमान झालेल्या लिझ ट्रस यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा का द्यावा? असे काय विपरीत घडले की, त्यांनी घरचा रस्ता धरावा. ब्रिटनच्या इतिहासात त्यांची कारकीर्द सर्वात अल्पजीवी ठरली. शपथ घेतल्यानंतर अवघ्या ४५ दिवसांत त्यांना राजीनामा द्यावा लागला. मात्र या काळात ब्रिटनने प्रचंड आर्थिक आणि राजकीय उलथापालथ पाहिली. या घटनाच ट्रस यांच्या गच्छंतीला कारणीभूत ठरल्या. मात्र, याची सुरुवात त्यांच्या निवडीच्या कारणापासूनच झाली होती. बोरीस जॉन्सन यांच्या राजीनाम्यानंतर सत्ताधारी हुजूर पक्षात झालेल्या निवडणुकीमध्ये आधीच्या सर्व फेऱ्यांमध्ये अर्थमंत्री ऋषी सुनक आघाडीवर होते तर ट्रस दुसऱ्या क्रमांकावर होत्या. मात्र, अखेरच्या फेरीत ट्रस यांनी सुनक यांना मात दिली. याचे मुख्य कारण अखेरच्या फेरीत पक्षाच्या सर्वसामान्य सभासदांनी मतदान केले. ट्रस यांनी पंतप्रधान झाल्यास मोठ्या करकपातीचे आश्वासन दिले होते तर अशी करकपात अर्थव्यवस्थेला धोका ठरेल, असा इशारा सुनक यांनी दिला होता. मात्र, ट्रस यांच्या घोषणेला भुलून त्यांना पक्षाने निवडून दिले. ही हुजूर पक्षाची सर्वात मोठी चूक ठरली, तिथल्या राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे. सत्तेत येताच ट्रस यांनी 'छोटा अर्थसंकल्प' सादर केला.अर्थमंत्री क्वासी क्वारतेंग यांच्या करवी त्यांनी कररचनेत मोठे बदल केले. मात्र, याचा उलटा परिणाम झाला. श्रीमंतांना करमाफी द्यायची तर उद्‌भवणाऱ्या महसूलतुटीचा खड्डा भरण्यासाठी निधी कुठून आणायचा, याचे नेमके उत्तर ट्रस-क्वारतेंग यांच्याकडे नव्हतेच. आधीच कोरोना आणि युद्धामुळे मंदी असताना या घोषणांमुळे



शेअर बाजार गडगडले आणि पौंड ऐतिहासिक रसातळाला गेला. यामुळे ट्रस यांच्यावरील पक्षाचा विश्वास उडाला. अत्यंत अपरिपक्व धोरणामुळे अर्थव्यवस्था गडगडल्यानंतर ट्रस यांनी आपल्या अर्थमंत्र्यांचा बळी दिला. आपलीच धोरणे राबवणाऱ्या अर्थमंत्र्यांना हाकलणे हे ट्रस यांच्या बाळबोध राजकारणाचे लक्षण मानले गेले. युरोपीय महासंघातून बाहेर पडल्यानंतर ब्रिटन आणि भारताच्या 'मुक्त व्यापार करारा'वर वाटाघाटी सुरू आहेत. करार अस्तित्वात येण्यासाठी दिवाळीचा मुहूर्त ठरला होता. मात्र ट्रस यांना स्वत:च्या देशाची आर्थिक घडी सुधारणारा हा करार करण्यात अपयश आले. ब्रेव्हरमन यांनी बुधवारी अत्यंत तांत्रिक कारणाने राजीनामा दिला. आपल्या खासगी ईमेल पत्त्यावरून अधिकृत कागदपत्रे पाठवल्यामुळे त्यांनी नियमांचा भंग केला आणि त्यांना राजीनामा द्यावा लागला. आपल्या राजीनामापत्रात चुकीची जबाबदारी स्वीकारण्यावरून ट्रस यांना खडेबोलही सुनावले. मात्र बुडते जहाज सोडण्यासाठी ब्रेव्हरमन यांनी केवळ कारण शोधले का, अशी शंका राजकीय तज्ज्ञांनी बोलून दाखवली. अपेक्षेप्रमाणे दुसऱ्याच दिवशी जहाज बुडाले. ब्रेव्हरमन यांच्या टीकेनंतरही आपण खुर्ची सोडणार नसल्याचे ट्रस सांगत होत्या. मात्र गुरुवारी एक महत्त्वाची घटना घडली. हुजूर पक्षातील सर्वात ज्येष्ठ पार्लमेंट सदस्य सर ग्रॅहम ब्रेडी यांनी अचानक ट्रस यांची भेट घेतली. ब्रेडी हे पक्षाच्या '१९२२ बॅकबेंचर्स कमिटी'चे अध्यक्ष आहेत. या भेटीत सर ब्रेडी यांनी ट्रस यांना निर्वाणीचा इशारा दिल्याचे सांगितले जाते. अखेर सर्व मार्ग संपल्याचे लक्षात आल्यानंतर ट्रस पायउतार झाल्या. सत्ताधारी हुजूर पक्षाच्या घटनेनुसार एकदा पक्षनेतेपदी (आणि पर्यायाने पंतप्रधानपदी) निवडून आल्यानंतर एक वर्ष कुणाला हटवता येत नाही. मात्र '१९२२बॅक बेंचर्स कमिटी' या पार्लमेंट सदस्यांच्या समितीला पक्षाची घटना बदलण्याचा अधिकार आहे. ट्रस यांना हटवायचेच असते, तर सर ब्रेडी यांची ही समिती एक वर्षाची मर्यादा हटवू शकली असती. त्यामुळे आणखी नामुष्की टाळून सरळ राजीनामा देण्याचा मार्ग ट्रस यांनी पत्करला. पक्षाच्या घटनेनुसार आता पुन्हा नेतेपदाची निवडणूक घ्यावी लागणार आहे. २८ ऑक्टोबरपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण होईल, असे ट्रस यांनी जाहीर केले. दोन महिन्यांपूर्वी झालेल्या निवडणुकीत ट्रस यांचे प्रतिस्पर्धी ऋषी सुनक यांचे नाव आता अर्थातच आघाडीवर आहे. सुनक यांची निवड झाल्यास ते ब्रिटनचे भारतीय वंशाचे पहिले पंतप्रधान होतील. माजी पंतप्रधान बोरीस जॉन्सन देखील रिंगणात उतरण्याच्या तयारीत असले तरी त्यांना फारसा पाठिंबा मिळण्याची शक्यता नाही. इंग्लंडसारख्या लोकशाहीप्रधान देशातही अस्थिरता निर्माण व्हायला लागलीय. शहकाटशहचे राजकारण आणि लोकानुनय हे त्या देशाला नडत आहे, असे दिसते.

## दीपोत्सव

# धनत्रयोदशी

२२ अन् २३ ऑक्टोबरला धनत्रयोदशी मुंबई, पुणे, नाशिक, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यात २२ ऑक्टोबरला धनत्रयोदशी साजरी करावी तर सोलापूर, औरंगाबाद, मराठवाडा, विदर्भात २३ तारखेला धनत्रयोदशी साजरी करावी. दिवाळीत धनत्रयोदशीला विशेष महत्व आहे. घरोघरी धनत्रयोदशीनिमित्त भगवान धन्वंतरी, लक्ष्मी कुबेर पुजन केले जाते.

**अश्विन कृष्ण त्रयोदशी म्हणजेच दिवाळी पर्वातील अत्यंत महत्वाचा दिवस म्हणजे धनत्रयोदशी. यंदा २ धनत्रयोदशी तिथी आल्या असल्याने महाराष्ट्रात काही विशेष जिल्ह्यांनी २२ तर काही जिल्ह्यांमध्ये २३ ऑक्टोबरला धनत्रयोदशी साजरी करावी असे पंचांगकर्ते मोहन दाते सांगतात. उत्तम आरोग्याच्या प्राप्तीसाठी भगवान धन्वंतरीचे पुजन या दिवशी केले जाते. घरोघरी धनत्रयोदशी पुजन मोठ्या भक्तीभावाने केले जाते. धनत्रयोदशी पुजेची संपूर्ण माहिती तिही मंत्रांसहित अन् मुहूर्त जाणून घेऊया.**

धनत्रयोदशीला काय करावे..?

अश्विन शुद्ध त्रयोदशीला 'धनत्रयोदशी' म्हणतात. या दिवशी वस्त्रालंकाराची खरेदी करणे शुभ मानले जाते. या दिवशी उपवास करून घरातले द्रव्य व अलंकार पेटीतून काढून साफसुफ करुन व पुनश्च योग्य ठिकाणी ठेवावे. कुबेर, विष्णू, लक्ष्मी, योगिनी (देवी), गणेश, नाग आणि द्रव्यनिधी यांची पूजा करून खिरीचा किंवा धणे व गूळ यांचा नैवेद्य दाखवावा. या पूजेसाठी झेंडूच्या फुलांचे विशेष महत्त्व आहे. यासह गरजूंना यथाशक्ती दान द्यावे. या दिवशी सायंकाळी तेलाने भरून एक दिवा प्रज्वलित करावा व नंतर त्याची गंधादी उपचारांनी पूजा करून घराच्या दाराजवळ, धान्याच्या राशीजवळ ठेवावा. हा दिवा रात्रभर जळत राहणे आवश्यक आहे.

धनत्रयोदशीला पुजेची मांडणी ही पूर्वाभिमुख म्हणजेच पूर्व दिशेला असावी. या दिशेला १ चौरंग/ पाट ठेवून त्यावर लाल वस्त्र अंथरावे. या चौरंगाच्या मध्यभागी ५ विड्याची पाने ठेवावी. प्रत्येक विड्याच्या पानावर सुपारी, बदाम, खारीक, हळकुंड, रुपयाचे सुटे नाणे असे प्रत्येक पानावर ठेवावे. चौरंगावर कलश स्थापनेसाठी उजव्या बाजूला गहू किंवा तांदूळ टाकून त्यावर पाण्याने भरलेला कलश ठेवावा. या कलशात हळद, कुंकू, गुलाल, अक्षता, फुल, रुपयाचे नाणे, सुपारी व विड्याची ५ पाने ठेवून श्रीफळ (नारळ) स्थापित करावे. यानंतर चौरंगावर गणपती, लक्ष्मी, सरस्वती आणि कुबेर यासह धन्वंतरी देवाचा फोटो किंवा मूर्ती ठेवावी. यासह घरातील धन म्हणजे सोने- चांदी, पैसे ठेवावे. चौरंगाच्या उजव्या बाजूला समई प्रज्वलित करावी अन् पुजेसमोर छानशी रांगोळी काढावी, अशाप्रकारे धनत्रयोदशी पुजेची मांडणी करावी.

कुठलेही पुजन करताना आपण सर्वप्रथम गणेशाचे पुजन करतो. कारण गणपती बाप्पा आपले आराध्य दैवत आहेत. त्यामुळे गणेशाचे स्मरण करावे.

वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ।। या मंत्राचा उच्चार करुन गणेशाला गंधाक्षत पुष्प (फुल) अर्पण करावे.

कुबेर पुजन - या मंत्राचा उच्चार करुन कुबेराला गंधाक्षत पुष्प (फुल) अर्पण करावे. ॐ श्रीं ह्रीं क्लीं श्रीं क्लीं वित्तेश्वराय नमः।। ॐ ह्रीं श्रीं क्रीं श्रीं कुबेराय अष्ट-लक्ष्मी मम गृहे धनं पुरय पुरय नमः।। ॐ यक्षाय कुबेराय वैश्रवणाय धनधान्याधिपतये।। धनधान्यसमृद्धिं मे देहि दापय स्वाहा।।

विष्णू पुजन - या मंत्राचा उच्चार करुन भगवान विष्णूला गंधाक्षत पुष्प (फुल) अर्पण करावे. मङ्गलम् भगवान विष्णुः, मङ्गलम् गरुणध्वजः। मङ्गलम् पुण्डरी काक्षः, मङ्गलाय तनो हरिः।।

लक्ष्मी पुजन - या मंत्राचा उच्चार करुन लक्ष्मी देवीला गंधाक्षत पुष्प (फुल) अर्पण करावे.

श्री महालक्ष्म्यै च विद्महे विष्णु पत्न्यै च धीमहि तन्नो लक्ष्मी प्रचोदयात् ॐ।।

योगिनी (कुलस्वामिनी देवी) पुजन - या मंत्राचा उच्चार करुन कुलस्वामिनी देवीला गंधाक्षत पुष्प (फुल) अर्पण करावे.

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः।

नमः प्रकृत्यै भद्रायै नियताःप्रणताःस्म ताम् ।।

नाग पुजन - या मंत्राचा उच्चार करुन गंधाक्षत पुष्प (फुल) अर्पण करावे. ॐ नवकुलाय विद्महे विषदंताय धीमहि तन्नो सर्प प्रचोदयात ।।



गंधाक्षत पुष्प अर्पण करुन सर्व देवांना नमस्कार करावा. यासह आपण घरातील जे धन ठेवलं असेल त्याची मनोभावे पुजा करावी. यानंतर आपण जो कलश मांडला आहे त्याला ५ ठिकाणी गंध लावावा.

गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वती। नर्मदे सिन्धु कावेरी जले अस्मिन् सन्निधिम् कुरु।। या मंत्राचा उच्चार करुन कलशाला फुल, हार अर्पण करुन नमस्कार करावा.

ॐ धन्वन्तरये नमः । सुवासितं इत्रं समर्पयामि । वस्त्र अर्पण करावे. ॐ धन्वन्तरये नमः । वस्त्रं समर्पयामि । गंध लावावा. ॐ धन्वन्तरये नमः । गन्धं समर्पयामि । अक्षता अर्पण कराव्या. ॐ धन्वन्तरये नमः । अक्षतान् समर्पयामि । फुले अर्पण करावी. ॐ धन्वन्तरये नमः । पुष्पं समर्पयामि । ॐ धन्वन्तरये नमः । धूपम् आघ्रापयामि । उदबत्ती ओवाळावी. ॐ धन्वन्तरये नमः । दिपकं दर्शयामि । निरंजन ओवाळावी. देवाला धणे-गूळ/ खिरीचा नैवेद्य दाखवावा. ॐ धन्वन्तरये नमः । नैवेद्यं निवेदयामि । एक पळी पाणी देवासमोर अर्पण करावे. ॐ धन्वन्तरये नमः । आचमनीयं जलं समर्पयामि । देवाला फळे अर्पण करावी. ॐ धन्वन्तरये नमः। ऋतुफलं समर्पयामि । तांबूल विडा अर्पण करावा. ॐ धन्वन्तरये नमः । ताम्बूलं समर्पयामि । देवासमोर दक्षिणा ठेवावी.

ॐ धन्वन्तरये नमः । दक्षिणां समर्पयामि । कापूर निरंजन प्रज्वलित करुन देवाला ओवाळावे. ॐ धन्वन्तरये नमः । कर्पूरनीराजनं समर्पयामि । शेवटी हात जोडून खालील प्रार्थना म्हणावी. ॐ धन्वन्तरये नमः । नमस्कारं समर्पयामि । अथोदधेर्मथ्यमानात् काश्यपैरमृतार्थिभिः ।उदतिष्ठन्महाराज पुरुषः परमाद् भुतः ।। दीर्घपीवरदोर्दण्डः कम्ब्रुग्रीवोऽरुणेक्षणः । श्यामलस्तरुणः स्रग्वी सर्वाभरणभूषितः ।। पीतवासा महोरस्कः सुमृष्टमणिकुण्डलः । स्निग्धकुंश्चितकेशान्तः सुभगः सिंहविक्रमः ।। अमृतापूर्णकलशं विभ्रद् वलयभूषितः । स वै भगवतः साक्षाद्विष्णोरंशांशसम्भवः ।। सर्व रोगांचा नाश होऊन उत्तम आरोग्य प्राप्तीसाठी खालील मंत्राचे स्मरण करावे.

ऊं रं रूद्र रोग नाशाय धन्वन्तर्ये फट्।। यानंतर भगवान धन्वंतरीला श्रीफळ अर्पण करून आरती करावी. धनत्रयोदशीला धन्वंतरी पुजन केल्याने उत्तम आरोग्य अन् दीर्घायुष्य प्राप्ती होते.

***

## टुडेज ब्लॉग


# धडाकेबाज पावसाळा

**यावर्षीच्या धडाकेबाज पावसावरती आम्ही खुश आहोत. त्याला नावे ठेवावीत असे आम्हांला बिलकुल वाटत नाही. काय चुकलं आहे, कोठे चुकलाय, कसा चुकलाय याबाबत बोलावेसेही वाटत नाही. तो आपल्या थाटात आहे, रुबाबात आहे. स्वच्छंदपणे आणि मनसोक्तपणे, मनास येईल तिथे, मनात येईल तेंव्हा तो कोसळतो आहे. या भूमीस म्हणजे त्याच्याच एका भावंडांच्या भेटीस, तो मुक्तपणे येत आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते. एकमेकांची भावंड आहेत ती. त्यांच्या एकमेकांच्या संवादातून आणि समन्वयातून समस्त जीव या विश्वात वस्तीला राहिलेला आहे.**

यावर्षीचा पाऊस वेगळाच आहे. पावसाळा सुरू झाला की वर्षा सहलीसाठी फिरणारी तमाम आबाल वृद्ध मंडळी, आता मात्र घरात लपून बसलेली आहे. याच पावसाला नावे ठेवत. मनुष्य प्राण्याला सगळं उपभोगायला हवे आहे. खूप काही पदरी आले तरी तो मात्र चिडचिडच करतो आहे, वैतागतो आहे आणि बऱ्याच वेळा या स्थितीत तो हतबल झालेला दिसतो आहे.

ओढे, नाले, नद्या यांचा प्रवाह अडवण्याचा अधिकार मनुष्य जातीला कोणी दिला आहे का हो? या साऱ्या पावसाच्या पाऊलवाटा आहेत. रस्ते आहेत. महामार्ग आहेत. मनुष्य नावाच्या प्राण्याने यावर आघात केले आहेत. अतिक्रमण केले आहे. काही ठिकाणी तरी ते बुजवून टाकले आहेत.

गेली साडेचार महिने झाले पावसाने आपली विविध रूपे दाखविलेली आहेत. मनात येईल त्या प्रदेशात तो मनसोक्तपणे अवतरतो आहे. झोडपतो आहे. वाडा आहे का वस्ती आहे, का निर्जन प्रदेश आहे. छोटी मोठी गावे आहेत का शहरे आहेत, याचे पावसाला काहीच देणे घेणे नाही. 'सब भूमी गोपाल की ।' हेच त्याला माहित आहे.



पाऊस केंव्हा येणार, कधी जाणार, किती पडणार, तो सरासरी एवढा आहे, का त्यापेक्षा कमी आहे, का त्याहीपेक्षा जास्त आहे. मानव प्राण्यांनी या व अशा सगळ्या गप्पा मारत बसाव्यात. नाहीतरी त्याला आता उद्योगधंदा काय उरला आहे. तो निसर्गाशी खेळतो आहे, तो आपल्याच जीवाच्या सुखात गुंतला आहे. निसर्गाकडून याला भरभरून हवे आहे. मात्र आपण त्याला काही देणे लागतो, याचा विचारही त्याला आता करावयाचा नाही आहे. मग पावसाने तरी या मानवजातीची काळजी कशाला करायची. खरे तर पाऊस-पाण्याशिवाय जीव जगत नाही. मग या पाऊस पाण्याची भूतलावरील व्यवस्था नीट करायची जबाबदारी मनुष्य प्राण्यावर आहे का नाही? मनुष्य प्राणी ही जबाबदारी उचलतो का हो? एखाद्या वर्षी जर पाऊस कमी पडला तर, त्याच्या घराला ढुसण्या देऊन, म्हणजे ढगांना इंजेक्शन देऊन, त्याच्या शरीरातील पाणी बळजबरीने आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी, मनुष्यप्राणी खटाटोप करीत असतो. मग स्वेच्छेने, स्वच्छंदपणे आणि मुक्तपणे बसणाऱ्या पावसाच्या पाण्याला तो व्यवस्थित वाट करून का देत नाही?

मनुष्यप्राणी अती स्वार्थी आहे. शहरीकरणाच्या नादात, पावसाच्या पाण्याच्या प्रवाहात, तो अनेक अडथळे निर्माण करतो आहेत. त्याची दिशा बदलतो आहे. त्याच्यावर आक्रमण करतो आहे. मग जर मनुष्य प्राण्याकडून या पावसाच्या पाण्याची बूज राखली जात नसेल, त्याची किंमत ठेवली जात नसेल आणि त्याच्या वाहण्यात जर अडथळे निर्माण केले जात असतील, तर या पावसाने मनुष्य प्राण्याची चिंता कशाला व्हायची?

आम्ही तरी या वर्षाच्या पावसाळ्याला नावे ठेवू इच्छित नाही. त्यांनी आम्हांला हवे तसे पडावे, हवे तेंव्हा पडावे, हवे तेवढेच पडावे अशा भ्रमात जर मनुष्य पाण्याला राहायचे असेल तर तसे त्याने जरुर करावे. हे करताना तो स्वत:चीच दिशाभूल करून घेत आहे, हे त्यांनी विसरू नये.

पावसाळ्याच्या आगमनाप्रसंगी त्याच्या स्वागतास मनुष्यप्राणी जेवढा उत्साहाने तयार असतो, तेवढा त्याला निरोप देताना तो नसतो. मनुष्य प्राणी स्वार्थी आहे, हे कदाचित पावसाने आता पक्के ओळखले असेल. त्याच्या लक्षात आले असेल. निसर्गचक्र सांभाळायची जबाबदारी माझ्या एकट्याची नाही. हे ज्या दिवशी मनुष्य प्राण्याला कळेल, तेंव्हाच मी शिस्तीने येईन आणि शिस्तीने जाईन. हेच कदाचित पावसाळ्याला यावर्षी सांगावयाचे असेल. पावसाळ्यात सर्वसामान्यांचे हाल होतात. जनजीवन विस्कळीत होते हे सारे मान्य आहे. पण अरे मूर्खा, यात माझा काय दोष. शिस्त तुला नाही आहे. हे व असे त्याला मनुष्य प्राण्याला आवर्जून सांगायचे आहे. म्हणूनच कदाचित सध्या धडाकेबाजपणे येत तो आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवत आहे.

- श्रीनिवास वैद्य, सोलापूर.

## जन्म हा अखेरचा

# धर्माचारस्थल -१



परंतु रुद्राची संहारक शक्ती मात्र त्याला प्राप्त झालेली नाही. एका मनुष्यापासूनच आज अब्जावधी माणसे उत्पन्न झाली आहेत. मनुष्याजवळ जननक्षमता असल्यामुळे तो ब्रह्मदेवाचे कार्य करू शकतो. त्यासाठी कुणी त्याच्यावर आक्षेप घेऊ शकत नाही.

अलिकडे आपल्या देशाची लोकसंख्या वाढत चाललेली आहे म्हणून 'हम दो हमारे दो' असा प्रतिबंध केला आहे तो भाग वेगळा. परंतु सामान्यतः मुलांना जन्म देणे हा काही गुन्हा नाही. अन्न, वस्त्र, निवारा देऊन रक्षण करणे हे विष्णूचे कार्य आहे.

आपल्या कुटुंबाचे आणि समाजाचे रक्षण करणे हे कामदेखील मनुष्य करू शकतो. त्याबद्दलही त्याला कोणी दोष देणे शक्य नाही. परंतु जीवमात्राचा संहार करण्याचा अधिकार मात्र कोणत्याही मनुष्याला नाही. अधिकार नसला तरी मनुष्य प्राणिहिंसा करीत असतो. आपण ब्रह्मदेवाचे कार्य करू शकतो, विष्णूचे करू शकतो तर मग रुद्राचेच कार्य का करू नये? असे त्याला वाटत असावे. जे करण्याची तुम्हांला अनुमती दिलेली आहे, ते कार्य तुम्ही केले तर तुम्ही अपराधी ठरत नाही. परंतु ज्याची अनुमती नाही, असे काम केले तर तुम्ही शिक्षेस पात्र व्हाल.

**(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

# शिस्तप्रिय कादंबरीकार ना. सी. फडके

## जनमानस

याच दिवशी मराठी वाङ्मयातील एक कथाकार व प्रणयरम्य कादंबरीकार ना. सी. फडके यांचे पुणे येथे १९७८ साली निधन झाले. ना. सी. फडके यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील कर्जत येथे ४ ऑगस्ट १८९४ रोजी झाला. त्यांचे वडील सीताराम फडके हे सरकारी नोकरीत असल्यामुळे त्यांच्या बदल्या अनेक ठिकाणी झाल्या. त्यामुळे त्यांचे शिक्षण वडूज, बार्शी तसेच पुणे येथे झाले. माध्यमिक शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी विद्यालय व महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले. एम. ए. ला तत्वज्ञान हा विषय घेऊन त्यांनी पदवी मिळविली. काही दिवस त्यांनी मराठी व केसरी या वर्तमान पात्रात असिस्टंट असिस्टंट एडिटर म्हणून १९१९-१९२० साली काम केले. १९२० साली त्यांनी असहकार आंदोलनात नोकरीचा राजीनामा देऊन उडी घेतली. १९२६ ते १९५१ या काळात त्यांनी कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये सायकॉलॉजी व तत्वज्ञाचे प्राध्यापक म्हणून काम पाहिले. तेथेच त्यांची कमला दीक्षित यांच्याशी ओळख झाली. कमला दीक्षित या ना. सी. फडके यांच्या विद्यार्थिनी होत्या. ना. सी. फडके यांचे कमला दीक्षित यांचेबरोबर प्रेमसंबंध जुळले. त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. या अगोदर त्यांचा पहिला विवाह झाला होता. हा विवाह त्याकाळी महाराष्ट्रभर गाजला होता. ना. सी. फडके यांनी अनेक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्या ह्या तंत्रशुद्धता, रेखीवपणा, आकर्षक प्रारंभ मधेच गुंतागुंत व शेवट सुदर अशाप्रकारे रसिकांना भुरळ घालत असत. या कादंबऱ्या त्याकाळी तरुण वर्गात अतिशय लोकप्रिय झाल्या होत्या. त्यामध्ये



१९१७ साली त्यांची 'अल्ला हो अकबर' ही पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. अखेरचे बंड, अटकेपार, कलंक शोभा, कुलाब्याची दांडी, जादूगार, प्रवासी या त्यांच्या काही गाजलेल्या कादंबऱ्या होत.त्यापैकी कलंक शोभा या कादंबरीवर चित्रपट निघाला होता. ना. सी. फडके यांची अध्यक्ष म्हणून रत्नागिरी येथे १९४० साली भरलेल्या साहित्य संमेलनात निवड झाली होती. त्यांनी अनेक काळ रत्नाकर, अंजली व झंकार ही मासिके चालविली होती. त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल त्यांना भारत सरकारतर्फे 'पद्मभूषण' ही पदवी देऊन १९६२ साली गौरविण्यात आले होते. आपल्या सेवानिवृत्तीनंतर ते पुण्यात स्थायिक झाले व लेखन करू लागले. २२ ऑक्टोबर १९७८ रोजी त्यांचा पुण्यात मृत्यू झाला. त्यांच्या स्मृतीस विनम्र आदरांजली.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# कुणालाच कशी सुचली नाही...!

पावसाच्या पुरात शेतकऱ्यांचं धान्य वाहून गेलं. अस्मानीचा जोर सुलतानीच्या अनंत पट असतो. हे निसर्गाने पुन्हा एकदा सिद्ध केले. अशा वेळी हवालदील झालेल्या शेतकऱ्यांच्या घरात आनंदाची दिवाळी घडावी, मुक्या जनावरांचा मालक बळीराजा संकटात सापडला.त्याला आधार मिळावा, अस्तित्वात असलेल्या नव्या सरकारचा दिलासा मिळावा म्हणून भावाची बहिणीला भेट समजून शिंदे-फडणवीस सरकारने मदत पाठवली आहे. या आधीच्या पाव शतकात गरिबांची, सर्वसामान्य माणसांची दिवाळी अशी झालीच नव्हती. सत्ता आणि संपत्तीच्या मुजोरीपणात आमच्यासारख्यांना असले काही सुचलेच नव्हते परंतु शेवाळलेल्या पाटील-देशमुखांच्या राजकारणानंतर धनिकांचे सत्तांतर होऊन बलुतेदारांचे सरकार मराठी मुलखात आले आणि त्यांना दिवाळीच्या सणाचे ताट रिकामे वाटले. म्हणूनच शिंदे-फडणवीस बंधूंनी बहिणीसाठी फराळ (शिधा) पाठवला. त्याचे अवघ्या महाराष्ट्रातल्या गरिबांनी कौतुक केले. पाव शतकात असे घडले नाही. थोडे बाजूला राहू द्या. परंतु अलिकडे भुईमूगाच्या शेंगाची जाण असलेले जाणकार नेते विकास आघाडीत असतानाही त्यांना दिवाळीच्या फराळाचे सुचले नाही, मनातही आले नाही. बागायतदारांच्या शेजारी पाच एकराचा कोरडवाहू, तीन एकराचा अल्पभूधारक शिवारात, वावरात राबतोय हे साखर संघाच्या कधी लक्षात देखील आले नाही. घरा-घरात असा दिवाळीचा फराळ पोहोचवणे हे काम एवढे सोपे नाही. तरीदेखील ऐंशी टक्के भागात बुधवारीच शिधा रेशनदुकानापर्यंत पोहोचला. परंतु अजूनही वीस ते तीस टक्के दुर्गम भागात पोहोचणे अवघड गेले आहे. परंतु मोठ्या कष्टाने तिथेही पोहोचतो आहे. पंधरा साखर कारखान्याच्या मालकांना रात्रीतून मोठे झालेल्या धनिकांना आशीर्वादाने घराण्याचा सातबारा वापरून सत्ता मिळवलेल्या नवाटांना गरिबांची दिवाळी कळायला थोडासा वेळ लागतो.




रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर म्हणून जगाचा अनुभव असलेल्या अर्थतज्ञाला आणि भारताच्या प्रधानमंत्र्याला देखील कष्टाळू शेतकऱ्याला वार्षिक पेन्शन म्हणून प्रत्येक कुटुंबात शेतीमालकाला सहा हजार रुपये देता येतात. अशी तळमळ, असा कळवळा चहावाल्याला कळला, परंतु गरिबांच्या नेत्यांकडून अशी कधी मागणीदेखील झाली नाही. न मागताच राष्ट्राच्या रखवालदाराने तिजोरीतून सरळ शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रतिवर्षी सहा हजार रुपये न मागता जमा केले. कारण बलुतेदाराबद्दलची तळमळ, गरिबांबद्दलचे वात्सल्य, मदत करण्याबद्दलची भूमिका, केदारनाथाचे औदार्य छत्रपती शाहू राजानंतर प्रधानमंत्री मोदीजींनी दाखवलं. यामध्ये आधी पक्षाचे शिपाई म्हणून रेशन दुकानातून प्रत्येक कुटुंबात शिधा गेला किंवा कसे? याची खात्री केली पाहिजे.

दीनदयाळ उपाध्याय यांच्या अंत्यजाच्या मुलाचे कल्याण हीच भूमिका शिधा वाटपाच्या दिवाळी भेटीत आहे. परंतु आघाडीतल्या कोणत्याही पक्षानं असं केलं नाही. आणि जे शिंदे-फडणवीसांच्या कष्टमय धोरणातून दिवाळी भेटीचा संकल्प झाला. त्याबद्दल दिवाळी भेटीचे कौतुक नाही उलट पंचनामा करण्यात विरोधक धन्यता मानतात. त्याच्या सात्त्विक मनाला वेदना होतात. दिवाळी भेटीबद्दल आणि एकंदरीत राज्य सरकारने दाखवलेल्या शिधावाटप माणुसकीसाठी लाख लाख शुभेच्छा!!!

**- प्रा. लक्ष्मण ढोबळे (माजी मंत्री) भाजपा प्रांतिक सदस्य, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# लवंगीच्या भैरवनाथ शुगरमध्ये गळीत हंगामाचा शुभारंभ

✔ सुराज्य/सोलापूर

**मंगळवेढा तालुक्यातील लवंगी येथील भैरवनाथ शुगरचा ९ वा गळीत हंगाम शुभारंभ उपविभागीय पोलीस अधिकारी सौ.राजश्रीताई पाटील, ह.भ.प.सद्गुरू समर्थ व्हनमोरे महाराज व धनश्री परिवाराचे प्रमुख मा.प्रा. शिवाजी काळुंगे यांच्या हस्ते गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून करण्यात आला. यावेळी भैरवनाथ शुगरचे चेअरमन मा.प्रा.शिवाजीराव सावंत, व्हा.चेअरमन मा.अनिल(दादा) सावंत व आदित्य अनिल सावंत उपस्थित होते.**



सुरुवातीस उपविभागीय पोलीस अधिकारी सौ.राजश्रीताई पाटील यांच्या हस्ते ऊस वजन काटा पूजन व ऊसाने भरलेल्या वाहनांचे विधिवत पूजन करण्यात आले. सत्यनारायण पुजा श्री.इंद्रजीत पवार व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.उर्मिला यांचे शुभहस्ते करण्यात आली. कार्यक्रमाचे वेळी चेअरमन प्रा. शिवाजीराव सावंत म्हणाले की, कारखान्याचे संस्थापक मा.ना.प्रा.डॉ.तानाजीराव सावंत साहेब (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या मार्गदर्शनाखाली पाठीमागील ८ गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्ण केलेले आहेत. तसेच या वर्षी ऊसाची क्षेत्र मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून नोंदींचा सर्व ऊस गाळपास आणण्यात येईल.

त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी करू नये. आजपर्यंत ज्या विश्वासार्हतेवर कारखान्याने गळीत हंगाम पूर्ण केलेले आहेत त्याच विश्वासावर चालू गळीत हंगाम पूर्ण होईल असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. यासाठी लागणारी सर्व ऊस तोडणी-वाहतूक यंत्रणा कार्यान्वित असल्याचे सांगण्यात आले. कारखान्याचे संस्थापक प्रा.डॉ.तानाजीराव सावंत साहेब (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांनी कारखान्याचे ७ लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट दिलेले आहे ते आम्ही पूर्ण करू असे आश्वासन व्हा.चेअरमन मा. अनिल(दादा) सावंत यांनी यावेळी दिले.

यावेळी दामाजी संचालक बसवराज पाटील, तानाजी काकडे, गौडाप्पा बिराजदार, आरटीओ ऑफिसर माने साहेब, बाळासाहेबांची शिवसेना तालुका अध्यक्ष अशोक चौंडे, युवासेना अध्यक्ष स्वप्निल निकम श्रीपती माने, रामचंद्र जाधव, चंद्रकांत देवकर, तानाजी चव्हाण, समाधान जाधव, शाम गोगाव, जनरल मॅनेजर रवींद्र साळुंखे, वर्क्स मॅनेजर नानासाहेब पोकळे, प्रॉडक्शन मॅनेजर बाळासाहेब शिंदे, मुख्य शेतकी अधिकारी शिवाजी चव्हाण, शेतकी अधिकारी कृष्णदेव लोंढे, एच आर मॅनेजर संजय राठोड, ईडीपी मॅनेजर नवनाथ चव्हाण, केनयार्ड सुपरवायझर शंकर पाटील, फायनान्स अकौंटंट देवानंद पासले, इलेक्ट्रिक इंजिनिअर राजाराम कोरे, सुरक्षा अधिकारी प्रकाश कमळे, कार्यालय अधीक्षक अभिजित पवार यांच्यासह परिसरातील सरपंच, मान्यवर,पत्रकार बांधव व ऊस उत्पादक शेतकरी व तोडणी-वाहतूक ठेकेदार उपस्थित होते.



## गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकाऱ्यांकडून दिवाळी उपक्रमाचे कौतुक

✔ **सोलापूर** : प्रथम सत्राचा शेवटच्या दिवशी अक्कलकोटचे गटशिक्षणाधिकारी कुदसियॉ शेख, जिल्हा कन्नड विस्तार अधिकारी रतिलाल भुसे, कर्जाळ केंद्राचे केंद्रप्रमुख प्रकाश पाटील यांनी अचानक भेट देऊन शाळेची तपासणी केली. तद्नंतर दिवाळी सणाची सुट्टी २१ तारखेपासून सुरू होणार त्यामुळे सर्व विद्यार्थी व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. सुवर्णा बोरगांवकर यांनी सोलापूर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या दश-सुत्री उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सण,उत्सव व भारतीय संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी दिवाळी निमित्त घेतलेल्या उपक्रमाची माहिती सांगितली. 'दिवाळ सण आला हर्षाचा....या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वसुबारस, धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, भाऊबीज या पाच दिवस असलेल्या प्रत्येक दिवशी साजरा केल्या जाणाऱ्या दिवसाचे पौराणिक महत्त्व व त्यामागील कथा विद्यार्थ्यांना वर्गात साजरा करून माहिती सांगितली, तसेच आकाशकंदील बनविणे, पणत्या बनविणे, पणती रंगविणे, तसेच शेवटच्या दिवशी पहिली वर्गासाठी घेतलेल्या 'वाचन आकाशकंदील' - शब्दवाचन व रंगकाम दोन्ही या सर्व उपक्रमाची माहिती सांगितली. परंपरा जपत त्याला शैक्षणिकतेची जोड देऊन नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी यांनी कौतुक केले व विस्तार अधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे शब्दवाचन घेत उपक्रमाचे व वर्गशिक्षक यांचे कौतुक करून अभिनंदन केले. अशाप्रकारे दिवाळी उपक्रमातून शैक्षणिकतेची जोड देऊन आनंददायी शिक्षणाचे कौतुक गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख तसेच केंद्रातील कोन्हाळी शाळेचे मुख्याध्यापक पवार सर यांच्या उपस्थितीत प्रथम सत्राची सांगता होऊन दिवाळी सणाच्या शुभेच्छा सुवर्णा बोरगांवकर व विद्यार्थ्यांनी स्विकारल्या.


## राज्यातील ग्रंथालयाच्या ६०% वाढीव अनुदानासाठी मुनगंटीवार यांना साकडे

✔ **सोलापूर** : महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघ पुणे विभागाचे अध्यक्ष सदाशिव बेडगे व सचिव धोंडिराम जेवूरकर यांनी मंगळवार ११ ऑक्टोबर रोजी मंत्रालयात वने व सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ग्रंथालयाच्या ६०% वाढीव अनुदाना बाबत अर्थमंत्री यांच्या कडून तरतूद करुन घ्यावी यासाठी त्यांना निवेदन देवून साकडे घालण्यातआले. तसेच सन २०१२ पासून ग्रंथालय अनुदानात वाढ झाली नसल्यामुळे कर्मचारी यांची बिकट अवस्था असल्याने अनुदान वाढीची तरतूद करुन लवकर वितरीत करण्यात यावे असे महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघ पुणे विभागाचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी सांगितले उच्च व तंत्रशिक्षण मंत्री कार्यालयातील उपसचिव लुबाळ यांनाही निवेदन देण्यात आले. तसेच ग्रंथालय उपसंचालक प्रशांत पाटील यांच्या सोबत राज्यातील ग्रंथालय कर्मचारी यांच्या हिताचे निर्णय शासन स्तरावर झाले पाहिजे याविषयी सविस्तर चर्चा केली व आपण शासन दरबारी प्रयत्न करावा असे सांगितले. यावेळी ग्रंथालय संचनालयातील अधिकारी, अशोक सनमने, धोंडिराम जेवूरकर आदी उपस्थित होते.




## शिवणी येथील दिव्यांगाना फराळाचे वाटप

✔ **उत्तर सोलापूर** : उत्तर तालुक्यातील शिवणी गावातील दिव्यांगांना ५७ ग्राम निधीतून,महिला व बालकल्याण निधींतून पंखाचे वाटप गट शिक्षणाधिकारी बापूसाहेब जमादार,सरपंच प्रशांत राखे, ग्रामसेवक प्रतापसिंह भोई,तोवर सर,शालेय समिती अध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत वाटप करण्यात आले. ग्राम निधीतून गावातील मान्यता प्राप्त ५ दिव्यांगाना दीपावली सुखर होण्यासाठी १२ किलो साहित्य किट यामध्ये साबण, शेंगा, तेल, डाळ, रवा, साखर, मसाले आदी साहित्य, महिला व बालकल्याण योजनेतून २ पंखे, १५ व्या व्या वित्त आयोगातून सन २०२१-२२ मधून जि प प्रा शाळा आदी ६ ते ७ लाखाची कामे करण्यात आलेली आहेत. राखीव २५% निधीतून क्रिडा साहित्य व प्रयोग साहित्य देण्यात आले. जि प प्रा शाळा शिवणी जिल्ह्यात सुसज्ज आहे.यावेळी ग्रामपंचायत सदस्य,ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षक, मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका,ग्रामस्थ उपस्थित होते.




## कुर्डूवाडीत अंगणवाडी सेविकांचे रस्ता रोको

✔ **सोलापूर** : सोलापूर जिल्हा अंगणवाडी कर्मचारी संघ आणि कन्फेडरेशन ऑफ फ्री ट्रेड्युनियन सि, एक टियू आईच्या वतीने माढा तालुक्यातील अंगणवाडी सेविकेनां वेतन व पेन्शन मिळावे यासाठी कुर्डूवाडीतील पंढरपूर चौकात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. कुर्डूवाडी बार्शी बाह्यवळण चौकामध्ये रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी संघटनेच्या जिल्हा अध्यक्ष पार्वती स्वामी, संघटनेच्या अ. जनरल सेक्टरी लता मोरे, कुंभार सर, सिध्दार्थ प्रभुणे, यांनी यावेळेस आपली मनोगते व्यक्त केली. अंगणवाडी सेविकेनां वेतन निर्धारीत करणे त्यानी महागाई भत्ता लागू करणे निवृत वेतन देणे या विषयावर सविस मुद्दे मांडले. संघटनेने मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी महिला बाल कल्याण विभागाच्या यांना पत्र व्यवहार करून अंगणवाडी कर्मचाऱ्याचे प्रश्न तातडीने सोडवण्याची मागणी केली आहे यावेळी माढा, पंढरपुर, करमाळा या ठिकाणच्या अंगणवाडी सेविका मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.



## 'ऐका व वाचा' या योजनेचा शुभारंभ

✔ सुराज्य/सोलापूर

हिराचंद नेमचंद वाचनालय व स्टोरीटेल इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने वाचा आणि ऐका' या योजनेचा शुभारंभ वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते नदीष्ट' कादंबरीचे ऑडिओ बुक श्रोत्यांना ऐकवून करण्यात आले. वाचनालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमात यावेळी मंचावर वाचनालयाचे कार्यवाह डॉ.श्रीकांत कामतकर, मंजूषा गाडगीळ, स्टोरीटेल इंडियाचे हेड योगेश दशरथ, नदीष्ट या गाजलेल्या कादंबरीचे लेखक मनोज बोरगावकर, मुलाखतकार प्रसाद मिराजदार उपस्थित होते.

यावेळी बोलताना योगेश दशरथ म्हणाले, की पुस्तकांच्या ऐकण्याची सवयीतून पुस्तक वाचण्याची आवड वृध्दींगत होईल. दिवसेंदिवस पुस्तकं ऐकणा-यांची संख्या वाढत आहे. प्रवासात, दृष्टी कमी झालेल्यांना, वृध्दांना सहजपणे पुस्तके ऐकता येतात. जगात ऑडिओ बुकची वार्षिक उलाढाल वीस हजार कोटींची आहे. तर भारतात दीडशे कोटींची आहे.

यावेळी नदीच्या प्रेमात पडलेल्या नदीष्ट कादंबरीचे लेखक मनोज बोरगावकर, यांची मनोवेधक अशी प्रकट मुलाखत स्टोरीटेलचे मराठी विभाग प्रमुख प्रसाद मिरासदार यांनी घेतली. यावेळी प्रा. सुलभा पिशवीकर, प्रा. पुष्पा आगरकर नितीन वैद्य, डॉ. दत्ता घोलप, प्रा. राजशेखर शिंदे, देशपांडे इ. उपस्थित होते.



## पोलिस आयुक्तालयाकडून शहिदांना मानवंदना

✔ **सोलापूर** : २१ ऑक्टोबर १९५९ रोजी केंद्रीय राखीव पोलिस दलाचे पोलिस उपनिरीक्षक किरणसिंग यांच्या नेतृत्वात अक्साई या चिनच्या दुर्गम भागात १६ हजार फूट उंचीवर हॉट स्प्रिंग्ज येथे गस्त घालताना चिनी सैन्यांनी हल्ला केला आणि त्यात १० जवानांना वीर मरण आले.त्यांच्या स्मृतीपित्यर्थ हा दिवस शहीद स्मृतीदिन म्हणून साजरा होतो.

शहर पोलिस आयुक्त डॉ.राजेंद्र माने, महापालिका आयुक्त पी.शिवशंकर,पोलिस अधीक्षक तेजस्वी सातपुते,अप्पर पोलिस अधीक्षक हिंमत जाधव, पोलिस उपायुक्त डॉ.दिपाली धाटे,डॉ.वैशाली कडूकर, बापू बांगर, पोलिस प्रशिक्षण केंद्र, केगावच्या प्राचार्या स्नेहा मोरे यांनी शहीद स्तभांस मानवंदना दिली.त्याचवेळी १ सप्टेंबर २०२१ ते ३१ ऑगस्ट २०२२ या कालवधीत कर्तव्य बजावताना हौतात्म्य प्राप्त केलेल्यांनाही श्रध्दांजली वाहण्यात आली. याप्रसंगी पोलिस आयुक्तालयाच्या माध्यमातून आयोजित रक्तदान शिबिरात ३१ जणांनी सहभाग घेतला. त्यासाठी डॉ.सुशिल सोनवणे,कपील गायकवाड, डॉ.प्राची भोसले, डॉ.दिव्या बोगाडे, डॉ. सोनाली शिंदे यांनी परिश्रम घेतले.



## विवेक वर्धिनीतील विद्यार्थ्यांनी तयार केले आकाश कंदील

✔ **पंढरपूर** : दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ पंढरपूर संचलित,विवेक वर्धिनी विद्यालयात स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव यनिमित्त कार्यानुभव विषयांतर्गत दीपावली सणानिमित्त आकाश कंदील तयार करण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत इयत्ता पाचवी तुकडी -ड या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले. प्रथम क्रमांक कु. नंदिनी करचे, द्वित्तीय क्रमांक विभागून कु.अर्पिता शिंदे प्राप्ती खेडकर ,तृतीय क्रमांक शितल पाथरुड या सर्व स्पर्धकांना प्रशालेचे प्राचार्य राजेंद्र पाराध्ये व पर्यवेक्षक सुनील पाटील यांनी प्रमाणपत्र व बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे आयोजन व मार्गदर्शन बबन कोकतरे, मल्लिकार्जून गुरव, राजुभाई मुलाणी यांनी केले.

## येवती येथील ग्रामपंचायत इमारत मोडकळीस

✔ सुराज्य/चिखली

मोहोळ तालुक्यातील येवती येथील ग्रामपंचायत इमारत पूर्णपणे मोडकळीस आली आहे. पावसात छत गळत असून त्यात स्लॅबचे तुकडे पडत असल्याने त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत पूर्णपणे धोकादायक बनली असून सध्या भीतीच्या वातावरणातच ग्रामसेवक सदस्य कर्मचा-यांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत आहे. अशा भितीच्या वातावरणात ग्रामपंचायतीचे कामकाज सुरू असून दुसरीकडे जागा उपलब्ध नसल्याने मोठी अडचण निर्माण झाल्याची माहिती सरपंच भाग्यश्री खुर्द यांनी दिली आहे.

येवती गाव हे आष्टी तलाव, उजनी कालव्यामुळे संपूर्ण बागायत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतचे उत्पन्न देखील बर्यापैकी आहे. मात्र या ग्रामपंचायतीची इमारत जवळपास




ग्रामपंचायतीची इमारत हि फार जुनी असून सदर इमारतीचे स्लॅब अंत्यत जिर्ण झालेले आहे. भीज पावसाळ्यात गळत असून स्लॅबचे तुकडे देखील निखळून पडत आहेत. त्यामुळे नागरिकांचे दैनंदिन कामकाज करणे अवघड झाले आहे.

— एल.एन. राऊत, ग्रामसेवक

१९५२ सालाची म्हणजे आजतागायत ७० वर्षांची जुनी आहे. सदरच्या इमारतीला चोहोबाजूंनी दगडी बांधकाम केलेले असून त्यावर स्लॅब टाकण्यात आले आहे . परंतु दररोज पडणार्या भिज पावसामुळे पाणी मुरून इमारतीचं स्लॅब कुमवत झाले आहे . स्लॅबचे संपूर्ण स्टील उघडे पडले असून कधी काळी स्लॅबचा तुकडा डोक्यात पडून जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही इतकी विचित्र अवस्था निर्माण झाल्याचे चित्र समोर आले आहे.

नादुरुस्त इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट तातडीने करावे असा ठराव देखील ग्रामपंचायत मार्फत मोहोळ जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला देऊन गटविकास अधिकाऱ्यां मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाही पाठवून दोन महिन्याचा कालावधी लोटला आहे. अद्यापही हालचाली अथवा याकडे प्रशासनाने लक्ष दिले नसल्याने नागरिकांचे दैनंदिन कामकाज कसे करावे याची अडचण निर्माण झाली असल्याचे सरपंच खुर्द यांनी सांगितले आहे.





## पी. एम. क्रिकेट क्लबतर्फे रक्तदान शिबिर

**सुराज्य/सोलापूर** : परमेश्वर माळगे (पी. एम.) क्रिकेट क्लब व मित्र परिवार आयोजित रक्तदान शिबिरामध्ये २०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक श्रीशैल हत्तुरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महादेव कोगणुरे, बसवण्णप्पा माळगे, गुरुशांत धुत्तरगावकर, संगीता जाधव, सातलिंग स्वामी, श्रीकांत डांगे, विजय कोनापुरे, शिवाजी वाघमोडे, विशाल गायकवाड, महेश देवकर, गोरख चौधरी आनंद तालिकोटी, अनुराधा खारे, संपदा जोशी, अमित रोडगे, खंडू सलगर, महादेव यलशेट्टी, डॉ. सिध्दाराम बगले, सुधाकर कोरे, मेघराज किलजे, संगमेश्वर माळगे, रोहित कदम, प्रशांत किलजे, श्रीशैल कुताटे शुभम पाटील उपस्थित होते. कार्यक्रमासाठी धर्मराज नाशी, सचिन कुसेकर, अविनाश बोधले, कौस्तुभ स्वामी, सदानंद कोकडे, अमर स्वामी, प्रमोद पाटील, शुभम टंकाळे, सौरभ पाटील, गिरीश किलजे, ओंकार हेले, दिनेश भालेकर, रितेश किलजे, गणेश हेले, हर्षल लकडे, रतिकांत मुस्के आदींनी परिश्रम घेतले.

## एसपीएममध्ये फ्रेशर्स पार्टीचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर** : प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांसाठी एसपीएम पॉलिटेक्निक कुमठे येथे फ्रेशर्स पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे जल्लोषपूर्ण वातावरणात गुलाब पुष्पांचा वर्षाव करून स्वागत करण्यात आले. यामध्ये डीजे, विविध गेम्स, रॅम्पवॉक, गायन, नृत्य व रिफ्रेशमेंट आदिंचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने विश्वस्त प्रा. स्वाती माने, प्राचार्या रोहिणी चव्हाण व विविध विभागाचे विभागप्रमुख आदींची उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्रथम वर्ष विभागप्रमुख प्रा. गिरिजा दीक्षित यांनी केले. कार्यक्रमामध्ये कुमठे ज्युनिअर कॉलेजचे प्रा. संजय जाधव यांचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याने संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. प्रथम वर्षातून मिस्टर फ्रेशर म्हणून हर्षवर्धन गरड तर मिस फ्रेशर- प्रतीक्षा कापसे हिला सन्मानित करण्यात आले. तर रॅम्पवॉक स्पर्धेमध्ये मिस्टर प्रिन्स-समर्थ माने व मिस प्रिन्सेस-अर्चना दिकोंडा यांना ऑनलाइन वोटिंगद्वारे निवड करून सन्मानित करण्यात आले.

सूत्रसंचालन तेहसीन मोमीन, सोनी चाबुकस्वार, चिन्मय पोगुल व पूर्वा बिराजदार यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा. ज्ञानेश्वर जाधव, प्रा. राहुल तीर्थकर, प्रा. स्वाती पाटील, प्रा. कालिका सुतार, प्रा. प्रीती गरड, प्रा. स्नेहल गायकवाड, विभागप्रमुख प्रा. प्रकाश मेलगे, प्रा. शैलेश बिराजदार, प्रा. धनंजय माने, प्रा. मल्लेशी बगले तर विद्यार्थी प्रतिनिधी भाग्यश्री महाजन, प्रदीप रजपूत, विक्रम वैरागकर, प्रियांका कांबळे, अमिता चव्हाण, तेजस केकडे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. स्वाती पाटील तर आभार प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांनी मानले.

## मुक्ताबाई वाघमारे यांचे निधन



**सुराज्य/सोलापूर** : मुक्ताबाई सिद्धू वाघमारे (वय ६०, रा. कुमठे, उत्तर सोलापूर) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, दीर व जाऊ असा परिवार आहे.

## गवार स्वस्त, काकडी महागली

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शुक्रवार, २१ ऑक्टोबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार गवार स्वस्त तर काकडी महागली आहे. तर कारली, वांगी, कोबी, कोथिंबीर, फ्लॉवर, लसूण, कांदा पात, बटाटा, पालक आदींचे भाव प्रतिक्विंटल १०० ते हजार रूपयेने वाढले. तर ढोवळी मिरची, लिंबू, कांदा, टोमॅटो, गहू आदींचे दर आज स्थिर राहिले.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ३,००० | ९,००० | ४,५०० |
| कारली | १,५०० | ३,२०० | २,५०० |
| वांगी | १,५०० | ५,००० | २,५०० |
| कोबी | ७०० | १,२०० | ९०० |
| ढोवळी मिरची | ८०० | १,२०० | १,००० |
| गाजर | १,५०० | २,२०० | २,००० |
| गवार | ३,००० | ५,५०० | ४,००० |
| कोथिंबीर | ४०० | १,२०० | ८०० |
| काकडी | ४०० | १,५०० | १,००० |
| फ्लॉवर | ४०० | १,४४० | १,००० |
| लसूण | १,०५० | ४,००० | १,९०० |
| घेवडा | २,५०० | ४,००० | ३,५०० |
| हिरवी मिरची | ८०० | २,२०० | १,५०० |
| अंबाडी भाजी | ३०० | ५०० | ४०० |
| कांदा पात | ५०० | ७०० | ६०० |
| बटाटा | ८०० | २,८५० | २,२०० |
| राजगिरा | ३०० | ६०० | ५०० |
| लिंबू | १,१०० | ५,००० | २,६०० |
| तांदूळ | ३,००० | ६,४०० | ३,७०० |
| दोडका | १,००० | ५,००० | ३,००० |
| शेपू | ६०० | ९०० | ७०० |
| पालक | ६०० | ८०० | ७०० |
| टोमॅटो | १,००० | ३,००० | १,५०० |
| गहू | २,३१० | ३,३७५ | २,७५० |

# शेतकऱ्यांसह कामगारांचे हित जोपासले जाईल : चेअरमन अवताडे

### अवताडे शुगरचा पहिला बॉयलर प्रदीपन

**सुराज्य/पंढरपूर**

**अवताडे शुगर हा कारखाना शेतकऱ्यांच्या सहकार्यावर चालू हंगामात प्रतिदिन पाच हजार मे. टन ऊस गाळप करून हंगाम यशस्वी पद्धतीने पार पाडण्याचा निश्चय आम्ही केला असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण ऊस आवताडे शुगर कारखान्यास घालून सहकार्य करावे, सर्व तोडणी ठेकेदार व कामगारांच्या सहकार्याने आम्ही हा गळीत हंगाम चांगल्या प्रकारे पार पाडणार असल्याचा विश्वास कारखान्याचे चेअरमन संजय अवताडे यांनी व्यक्त केला.**




अवताडे उद्योग समूहाने नुकताच खरेदी केलेल्या अवताडे शुगर अँड डिस्टलरीज या कारखान्याचा पहिला गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा ऊस उत्पादक शेतकरी आण्णाप्पा काकणगी व विष्णुपंत अवताडे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी उभयतांच्या हस्ते सत्यनारायण महापूजा करून बॉयलर अग्नी प्रदीपन करण्यात आले.

यावेळी कारखान्याचे चेअरमन संजय अवताडे, बाजार समितीचे सभापती सोमनाथ अवताडे, दामाजी शुगरचे माजी व्हा. चेअरमन अंबादास कुलकर्णी, पंचायत समिती माजी सभापती प्रदीप खांडेकर, मिस्टर सभापती सुधाकर मासाळ, माजी उपसभापती सुरेश ढोणे, कात्राळचे सरपंच विजय माने, भैय्या कळसे, सद्गुरूचे संचालक मोहन बागल, शांतिनाथ बागल, महेश चव्हाण, शेखर भोसले, दादा ढोले, आबासाहेब पाटील, लक्ष्मण जगताप, युवराज शिंदे, प्रहारचे समाधान हेंबाडे, राजीव बाबर, शिवयोगप्पा पुजारी, बटू पवार, बसू पाटील, पप्पू काकेकर, सचिन शिवशरण, स्मिता म्हमाणे यांच्यासह माजी शिवसेना तालुका प्रमुख प्रा. येताळा भगत, सरोज काझी, प्रमोदकुमार म्हमाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

अवताडे पुढे म्हणाले की, 'माझे बोलणं कमी व काम जास्त असते कारखान्याला ऊस घालणारे सर्व शेतकरी कामगार यांचं समाधान होईल, असे काम आम्ही करणार आहोत या कारखान्याची पाच हजार मे. टन गाळपाची क्षमता आहे हा कारखाना आमदार समाधान आवताडे यांचे मार्गदर्शनाखाली अवताडे उद्योग समूहाने न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून आपल्या ताब्यात घेतला आहे.

या कारखान्यात उपपदार्थ निर्मितीची सोय असून ६५ केएलपीडी डीसलरीज निर्मिती होते. तर ३२ मेगावॅट को-जन निर्मितीही होते. हा कारखाना सुरू झाल्याने सुमारे सातशे कामगारांना पुन्हा रोजगार मिळाला आहे. त्याचबरोबर २५० मोठ्या वाहनांचे करार झाले असून २०० डंपिंग ट्रॅक्टर व २०० बैलगाड्यांचेही करार केले असून सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे.

त्याचबरोबर आमदार समाधान अवताडे यांचे मार्गदर्शनाखाली कारखान्याचा सुमारे सहाशे एकर परिसर असल्याने कारखाना परिसरात तरुणांना आणखी रोजगाराच्या संधी निर्माण करणार असल्याचेही चेअरमन संजय अवताडे यांनी सांगितले.

कारखान्याचे कार्यकारी संचालक मोहन पिसे म्हणाले की, 'हा कारखाना आम्ही साडेचार ते पाच हजार मे. टन प्रतिदिन क्षमतेने चालविणार आहे. त्याचबरोबर हा कारखाना सुरू झाल्याबरोबर दीड महिन्यानंतर को-जन वीजनिर्मिती सुरू होणार आहे त्याच बरोबर डिस्टलरीही सुरू होणार असून ऊस उत्पादकांना जास्तीत जास्त दर देण्याचा आमचा प्रयत्न असणार असल्याचे कार्यकारी संचालक मोहन पिसे यांनी सांगितले. यावेळी प्रा. येताळा भगत, भाजपचे जिल्हा संघटक शशिकांत चव्हाण, सोमनाथ अवताडे, जमदाडे यांनी मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमास कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कूर्मदास चटके, विनायक यादव, भारत निकम, बापू काकेकर, ॲड. धनंजय जाधव, बिभिषण बेदरे, डॉ. ताणगावडे, गणेश गावकरे, विकास पुजारी, बापूसाहेब मेटकरी, तानाजी पाटील, रावसाहेब राजमाने, शिवाजी रणे, सचिन चौगुले, चनबसू येनपे, नंदू जाधव, सुहास पवार, सुभाष सरगर, बालाजी मेटकरी, प्रसाद सातपुते, समाधान घायाळ, अमोल माने, जकापा नरुटे, जगन्नाथ रेवे, धनंजय पवार, चंद्रकांत पडवळे, तानाजी डोके, विलास राठोड, भास्कर घायाळ, लक्ष्मण जाधव, आयुब शेख, दत्ता कोळेकर, गणेश पाटील, परमेश्वर येणपे, मोहन पवार, संभाजी फाळके, रघुनाथ उन्हाळे, रमेश पवार, संपत आठवळे, वसंत लेढवे, बबन रोंगे, दामोदर रेवे, मिन्हाज शेख, अजय सरवळे, श्रीकांत रोंगे, रणजित पवार आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासो कदम यांनी तर आभार राजेंद्र पोतदार यांनी मानले.

# आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा विकासनिधीचा धडाका

### बोरगांव पाणी पुरवठा योजनेसाठी १३ कोटींच्या आराखड्यास मंजुरी

**सुराज्य/अकलूज**

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपसमितीच्या बैठकीत माळशिरस तालुक्यातील, १३ कोटी रूपयांच्या बोरगाव पाणी पुरवठा योजनेस तांत्रिक मंजूरी प्राप्त झाल्याने सन २०५४ पर्यंतचा म्हणजे पुढील तीस वर्षांपर्यंतचा बोरगावमधील नागरिकांचा पिण्याचा पाणी प्रश्न मिटणार आहे.**

> **बोरगाव पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात येणाऱ्या टाक्या**
> बोरगाव - २ लाख ८ हजार लिटर
> पालखी तळ - १ लाख २ हजार लिटर
> डी १९ - ६२ हजार लिटर

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्यातून व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून पाणी पुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्याने जल जीवन मिशन अंतर्गत १३ कोटी ७५ लाख रूपयांच्या बोरगाव पाणी पुरवठा योजनेस तांत्रिक मंजुरी मिळाली आहे.

भिमा नदीवरील करोळे बंधाऱ्यावरून महाळुंग जॅकवेलच्या शेजारून पाणी उचलले जाणार आहे व बोरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पाठीमागे जलशुद्धीकरण केंद्र उभारले जाणार आहे. तिथून बोरगाव व वाड्या वस्त्यांकरीता पिण्याचा पाणी पुरवठा होणार आहे.

आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी माळशिरस तालुक्यात विकास निधीचा धडका लावला असून ऊर्जा क्षेत्राकरिता ७० कोटी रूपये, निमगाव पाणी पुरवठा योजनेस ३३ कोटी रूपये व बोरगाव पाणी पुरवठा योजनेस १३ कोटी रूपये मागील दहा दिवसात तब्बल ११६ कोटी रूपये विकास निधी आणला असून खऱ्या अर्थाने सत्तेचा सदुपयोग कसा करायचे हे आ. रणजितसिंह मोहिते-पाटील दाखवून देत आहेत.

# 'जकराया' यंदा सर्वाधिक दर देणार : जाधव

### शेतकऱ्यांनी उत्तम प्रतीचा ऊस गाळपास आणावा

**सुराज्य/विरवडे बु.**

**जकराया साखर कारखाना लि. वटवटे ता. मोहोळ जि. सोलापूर कारखान्याचा सन २०२२-२०२३ या वर्षीचा बारावा गळीत हंगाम सुभारंभ कारखान्याचे संस्थापक/चेअरमन बिराप्पा भगवान जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.**



कार्यक्रमाच्या प्रस्तावित भाषणात कारखान्याचे कार्यकारी संचालक सचिन बिराप्पा जाधव म्हणाले की, 'चालू हंगामामध्ये ओव्हर ऑयलिंगची कामे पूर्ण झाली असून आपल्या कारखान्याकडे दोनशे ट्रॅक्टर टोळ्या, १९० डंपिंग, ५५० बैल गाड्या, १० हार्वेस्ट इतक्या वाहनांचा करार झाला असून पंच्याहत्तर टक्के यंत्रणा तोडणीसाठी हजर झाली असुन चालू हंगामासाठी कारखान्याने पाच लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवन्यात आले आहे.

चालू गळीत हंगामात नोंदी झालेल्या संपूर्ण ऊसाचे गाळप करनार आहे. यावर्षी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधिकतम एफआरपी द्यावयाची असून सुरुवातीस को ८६०३२ या वानास प्राधान्य देऊन तोडणी प्रोग्राम सुरु करीत आहोत. तरी ऊस उत्पादक सभासद, बिगर सभासद, भागातील शेतकऱ्यांनी घाई गडबडीने निर्णय न घेता जकराया कारखान्यवार विश्वास ठेवून कारखान्यास गळीतास जास्तीत जास्त ऊस द्यावा, असे आवाहन या प्रसंगी त्यांनी केले.

यावेळी कारखान्याचे संस्थापक चेअरमन ॲड. बिराप्पा जाधव यांनी सभासदांना दिला जानारा ऊस दर हा कशाप्रकारे दिला जातो याची माहिती दिली, चांगल्या प्रतिचा ऊस सभासदांनी देऊन अधिकतम एफआरपी देण्याचा विश्वास कार्यक्रमाप्रसंगी दिला, कारखान्याच्या रिकव्हरी बेसवर शेतकऱ्यांना चांगलाच दर देण्यात येईल, मागील दोन हंगामापूर्वीचे प्रति. मे. टन ५० रूपयेप्रमाणे पुरवणी बिल दीपावली सन गोड करण्याकरीता सभासदांना दिले जाईल. रिकव्हरी चांगली बसली पाहिजे तर कारखान्याला चांगला भाव देणे परवडणार आहे, असे सांगितले.

याप्रसंगी कारखान्याचे तज्ञ संचालक राहुल बिराप्पा जाधव, जकराया मल्टीस्टेट को-ऑफ. क्रेडिट सोसायटीच्या सीईओ मनिषा सचिन जाधव, येनकीचे माजी सरपंच हरिभाऊ घुले, मिरीचे प्रगतशील बागायतदार रफीक पटेल, प्रभाकर पाटील, श्रीधर माने, सिध्देश्वर मोरे, नंदकुमार आतकरे, भानुदास गावडे, जकराया देवस्थानचे पुजारी व बिरू जाधव, तानाजी गुंड, जकराया शुगरचे शेती अधिकारी नानासाहेब बाबर, चिफ इंजिनियर कुबेरदास कलुबर्मे, चिफ़ केमिस्ट सुब्राव पडसाळकर, फायनान्स मॅनेजर बंडोपंत साठे, अधिकारी, कर्मचारी तसेच भागातिल सभासद शेतकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन कारखान्याचे केन मॅनेजर विजय महाजन यांनी केले, तर आभार प्रशासकीय अधिकारी जकराया वाघमारे यांनी मानले.

# भारत फोर्जसाठी पंढरपूर स्वेरीच्या अकरावी विद्यार्थ्यांची निवड

**सुराज्य/पंढरपूर**

'भारत फोर्ज लिमिटेड' या बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील ११ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्यूहद्वारे निवड करण्यात आली आहे', अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

'भारत फोर्ज लिमिटेड' या नामांकित व बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून शिवराज बाळासाहेब काळे, गोपाळ गोविंद कांबळे, आकाश दत्तात्रय शिंदे, वेदांत संजू जाधव, जयराम प्रकाश लोंढे, रोहित दत्तात्रय विधाते, रंभाजी रामचंद्र नागरगोजे, प्रणय प्रदीप डिसले, आकाश रेवाप्पा कोळी, निखील दिलीप मुंढे व मिलींद शशिकांत जगदाळे या ११ विद्यार्थ्यांची निवड केली.

१९९८ साली स्थापन झालेल्या स्वेरी अभियांत्रिकीमधून प्लेसमेंटच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. स्वेरीचे विद्यार्थी आज विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यात आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. 'स्वेरी' मधून विविध कंपन्यात प्लेस होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे सध्याच्या आकडेवारीवरून दिसून येते.

**नावात बदल**

सोहनलाल अर्जुनराव जुनेजा आणि सोहन अर्जुनदास जुनेजा या दोन्ही नावची मी एकच व्यक्ती आहे. माझे खरे व बरोबर नांव सोहनलाल अर्जुनराव जुनेजा हेच आहे. तरी संबंधितांनी याची नोंद घ्यावी. हि विनंती.

सही/-
**सोहनलाल अर्जुनराव जुनेजा**
मु.पो. अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**EXTENSION OF PERIOD FOR BID SUBMISSION OF SRM E-TENDER NO. T-17/ 2022-23**

The submission period & last date of submission for following SRM e-tender is further extended up to 28.10.2022 up to 11:00 Hrs. Date of Opening (Tech. Bid): 28.10.2022 at 12:00 Hrs (If possible). All other terms & conditions of the e-tender will remain unchanged.

| Sr. No. | RFx No. | Name of Work | Tender No. | Estimated Cost Rs. EMD Rs. | Tender Fee Rs. | Work Completion Period | Date of Tender Submission | Date of Technical Bid Opening |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7000024933 | Work of Metal Spreading, G.I. Pipeline work of 33kV and 132kV Bay and Construction of 12x6m new stacking yard at 132 kV Substation Karmala, Dist: Solapur. | T-17/ 2022-23 | Rs. 16,81,722.00 Rs. 16,817.22 | (500 + GST) | 04 Months | 14.10.2022 (11:00 Hrs) up to 28.10.2022 (11:00 Hrs) | 28.10.2022 (12:00 Hrs.) (If possible) |

For further details, visit out website **https://srmetender.mahatransco.in/**
**Note :** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal **(https://srmetender.mahatransco.in).**

**Sd/-**
**Executive Engineer (Civil)**
**EHV, CCCM Division, Solapur**

**विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि.,गंगामाईनगर**
**ता.माढा,जि.सोलापूर**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कार्यकारी संचालक यांचेकडून या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि.,गंगामाईनगर,पो.पिंपळनेर, ता.माढा,जि.सोलापूर या संस्थेचे खालील सभासद पोट-नियमाप्रमाणे उत्पादक सभासद होते व त्यांच्या नावे कारखान्याचे शेअर्स मंजूर झालेले होते. सदर सभासदांचे नावे कारखान्याच्या रेकॉर्डला शेअर्स व इतर अशा रक्कमा जमा आहेत.खालील उत्पादक सभासद हे दुर्देवाने मयत झालेचे कळते.त्यामुळे सदर मयत सभासदांचे खालील वारसदारांनी कारखान्याकडे कागदपत्र सादर करून शेअर्स त्यांचे नावे वर्ग करणेसाठी विनंती केली आहे.

| अ.न | मयत सभासदाचे नाव | गाव | मयत झालेचा दिनांक | कोणाचे नावे वर्ग करावयाचे त्याचे नाव | गाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | डांगे जगन्नाथ पांडुरंग | पिंपळनेर | १/९/२०२१ | डांगे सतिश जगन्नाथ | पिंपळनेर |
| २ | लुंगसे विष्णु शंकर | लव्हे | ६/५/२०२२ | लुंगसे राजेंद्र विष्णु | लव्हे |
| ३ | कुटे संजय गोविंद | टेंभुर्णी | २/४/२०२२ | कुटे महेश संजय | टेंभुर्णी |
| ४ | देशमुख सुभेदार गुंडीबा | टेंभुर्णी | १७/०६/२०२० | देशमुख विष्णु सुभेदार | टेंभुर्णी |
| ५ | देशमुख लक्ष्मण गोपाळ | टेंभुर्णी | १५/०६/२०२१ | देशमुख भामाबाई उत्तम | टेंभुर्णी |
| ६ | पाटील रामदास तात्या | अकोले खु | ४/४/२०२१ | पाटील विठ्ठल रामदास | अकोले खु |
| ७ | जगदाळे संतोष संदिपान | परीतेवाडी | ६/५/२०२१ | जगदाळे ललिता संतोष | परीतेवाडी |
| ८ | घाडगे गोविंद नारायण | आहेरगाव | २२/०१/२०२२ | घाडगे शंकर गोविंद | आहेरगाव |
| ९ | परबत केशर शत्रुघ्न | अकोले बु | ७/१०/२०२१ | परबत अनिल शत्रुघ्न | अकोले बु |
| १० | पाटोळे भारत तुकाराम | अकुंभे | १/१०/२०२१ | पाटोळे मंगल भारत | अकुंभे |
| ११ | ढवळे भागवत रंगनाथ | सापटणे टें | १४/४/२०१९ | ढवळे बाळासाहेब भागवत | सापटणे टें. |
| १२ | कदम कोंडीबा गेनु | वडशिंगे | २६/०१/२०२२ | कदम सुधाकर कोंडीबा | वडशिंगे |
| १३ | कदम महादेव हरीदास | अकुंभे | १/१/२०२२ | कदम दत्तात्रय महादेव | अकुंभे |
| १४ | नांगरे नारायण विश्वनाथ | चव्हाणवाडी टें | १५/५/२०२१ | नांगरे सोमनाथ नारायण | चव्हाणवाडी टें |
| १५ | गवळी गजेंद्र राजाराम | लऊळ | २०/०४/२०२१ | गवळी कुलदिप गजेंद्र | लऊळ |
| १६ | धोका चंद्रकांत रतनचंद | कर्डुवाडी | २९/१०/२०१८ | धोका राहुल चंद्रकांत | कर्डुवाडी |
| १७ | चिंतामण पांडुरंग संभाजी | अकोले खु | २८/०८/२०१३ | कदम सागर तलकु | अकोले खु |
| १८ | काशिद बिभिषण रामचंद्र | कन्हेरगाव | ५/१/२००७ | काशिद वर्षा बिभिषण | कन्हेरगाव |
| १९ | टोणपे शंकर विठ्ठल | शिराळ मा | २२/०७/२०२० | टोणपे रामचंद्र शंकर | शिराळ मा |
| २० | हुलगे धोंडीराम मारूती | बेंबळे | १६/०५/२०२१ | हुलगे सोमनाथ धोंडीराम | बेंबळे |
| २१ | पालकर तुकाराम गोविंद | उपळाई खु | ३०/०१/२००६ | पालकर उत्तम तुकाराम | उपळाई खु |
| २२ | शिंदे सुशिला हनुमंत | निमगाव टें | २६/०८/२०११ | शिंदे मनिषा धवल | निमगाव टें |
| २३ | क्षिरसागर दत्तात्रय नामदेव | टेंभुर्णी | ७/८/२०२२ | क्षिरसागर अनिकेत सुभाष | टेंभुर्णी |
| २४ | बाबर भिवा संदिपान | परिते | ९/५/२०२१ | बाबर गणेश भिवा | परिते |
| २५ | पवार भानुदास महादेव | घोटी | २३/६/२०२२ | कोरके सुवर्णा विजय | घोटी |
| २६ | मिस्कीन शिवाजी जयराम | चव्हाणवाडी टें | २५/०८/२०२१ | मिस्कीन युवराज शिवाजी | चव्हाणवाडी टें |
| २७ | लोकरे यादवराव सावताराम | शिराळ टें | १३/११/२०२१ | लोकरे बापुराव यादवराव | शिराळ टें |
| | | | | लोकरे निलेश बापुराव | शिराळ टें |
| २८ | सुरवसे दिगंबर पंढरीनाथ | वेताळवाडी | ३०/०६/२०२२ | सुरवसे दिपक दिगंबर | वेताळवाडी |
| २९ | पाटील वसुदेव सुखदेव | अकोले खु | २/४/२०२२ | पाटील सौदागर वसुदेव | अकोले खु |
| ३० | शिंदे महादेव लक्ष्मण | शिंदेवाडी | ३०/१०/२०२१ | शिंदे सौदागर महादेव | शिंदेवाडी |
| ३१ | हेडगिरे भानुदास राजाराम | उपळाई बु | ३/१/२०१७ | हेडगिरे ऋषिकेश राजेंद्र | उपळाई बु |
| ३२ | शिंदे शारदा दत्तात्रय | निमगाव टें | १८/०४/२०२१ | शिंदे मनिषा बंडु | निमगाव टें |
| ३३ | खंडागळे केरू दगडु | टेंभुर्णीमालवंडी | १०/८/२०१९ | खंडागळे अशोक केरू | टेंभुर्णीमालवंडी |
| ३४ | कदम अनंता कृष्णा | वडशिंगे | ३०/०७/२०१० | कदम सुरज दत्तात्रय | वडशिंगे |
| ३५ | गाडे हरीबा मनोहर | तांदुळवाडी | २७/१२/२०२० | गाडे संकेत कांतीलाल | तांदुळवाडी |
| ३६ | निर्धार गौतम तानाजी | बेंबळे | १४/०७/२०२२ | निर्धार नेताजी गौतम | बेंबळे |
| | | | | निर्धार सुर्याजी गौतम | बेंबळे |

या जाहीर नोटीसाने सर्व संबंधीत वारसांना अगर मयतांचे कायदेशीर हक्क सांगणाऱ्या इसमांना कळविण्यात येते की, ही जाहीर नोटीस जाहीर झाल्यापासून १५ दिवसांचे आत वरील वारसांशिवाय ज्या कोणी हित संबंधीतास मयताचे वारस आहेत, असे कारखान्यास पटवून मयताचे शेअर्स ट्रान्स्फर करून घेण्याचा हक्क प्रस्थापित करणे असेल त्यांनी सर्व कागदपत्री पुरावा घेऊन कारखान्याच्या रजिस्टर ऑफिसच्या वेळेत कारखान्याच्या कार्यालयात आपले हक्क संबंधी शाबीदी करावी.अन्यथा वरीलप्रमाणे वारसांचे नावावर शेअर्स मा.संचालक मंडळाचे मंजूरीने आवश्यक पुर्तता करून घेवून वर्ग केले जातील याची सर्वांनी नोंद घ्यावी. असे या जाहीर नोटीसाने कळविण्यात येत आहे.

ही जाहीर नोटीस दिली दिनांक २२/१०/२०२२

सही/-
(एस.एन.डिग्रजे)
कार्यकारी संचालक

# ‘परती’च्या पावसाने द्राक्ष बागांवर फिरविले ‘पाणी’

## ▌खर्चात तिपटीने वाढ ▌घड जिरण्याचे प्रमाण वाढले ▌डाऊनी, घडकुजीचा धोका

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर जिल्ह्यातील परतीच्या सतत पडणाऱ्या पावसाने छाटणी झालेल्या द्राक्ष बागांवर पाणी फिरविले असून प्रत्येक वर्षी पेक्षा या वर्षी खर्चात तिपटीने वाढ झाली आहे. पोंगा अवस्थेतील द्राक्ष घड जिरण्याचे प्रमाण वाढले असून डाऊनी, व घडात पाणी साचून राहिल्याने घडकुजीचा मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे द्राक्ष बागायतदार पुरता कोलमडून पडला आहे.

जिल्ह्यात द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी फळछाटणी सुरू केली असून, आतापर्यंत सुमारे तीस टक्क्यांपर्यंत फळछाटणी झाली आहे. फळछाटणी केलेल्या द्राक्ष बागांची पोंगा, विरळणी, फुलोरा, तर काही ठिकाणी डीपिंगची अवस्था आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून परतीच्या पावसाने हजेरी लावली आहे.

या पावसामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची झोप उडाली आहे. त्यामुळे घड जिरणे, डाऊनी आणि करपा रोगाचा फैलाव होण्यास सुरुवात झाली आहे. द्राक्ष बागांवर परतीच्या पावसाचे ग्रहण लागले असल्याने ऐन छाटणीत पडणारा पाऊस द्राक्ष बागांच्या जिवावर उठला आहे.

जिल्ह्यात द्राक्षाचे सुमारे २० ते २५ हजार एकर क्षेत्र आहे. वास्तविक पाहता, दरवर्षीपेक्षा यंदाच्या हंगामात फळछाटणीस विलंब झाला आहे. त्यातूनही शेतकऱ्यांनी काटेकोर नियोजन करत फळ छाटणी घेतली आहे. पंढरपूर, बार्शी, सह इतर सर्वच तालुक्यातील शेतकऱ्यांना मागील १५ दिवसापासून फळछाटणीस सुरुवात केली असून

फळ छाटणी केल्यानंतर वेलींवर घड चांगल्या दर्जाचे लागले. हंगामपूर्व आगाप फळछाटणी केलेल्या द्राक्ष बागांची पोंगा, विरळणी, फुलोरा, तर काही ठिकाणी डीपिंगची अवस्था आहे. काही ठिकाणी वांझ फूट काढण्याची कामे सुरू आहेत. मात्र पावसामुळे द्राक्ष हंगाम छाटणीपासून अडचणीत आला. काही ठिकाणी बागांवर डाऊनी रोगाचा प्रादुर्भावही झाला असल्याचे चित्र आहे. तर दुसरीकडे घड जिरण्याचा प्रकारही होऊ लागला आहे. आता पडणाऱ्या पावसामुळे या द्राक्षाचे नुकसान होण्यास प्रारंभ झाला आहे. सध्याच्या बदलत्या नैसर्गिक हवामान परिस्थितीचा अंदाज हवामान खात्यालाही येत नाही. त्यामुळे एकाच गावात पडलेल्या पावसावरून इतर गावांचा पाऊस गृहीत धरणे कितपत योग्य आहे? असा प्रश्न आता शेतकऱ्यांतून उपस्थित केला जात आहे. तर पीक विमा हा हवामानावरच आधारित असतो. या यंत्रांवर मोजमाप झालेल्या पावसाच्या नोंदींवरच शेतकऱ्यांना लाभ दिला जातो.



### फळछाटणीला ’ब्रेक’

सध्या पाऊस असल्याने बागेत पाणी साचले आहे. यामुळे बहुतेक द्राक्ष उत्पादक द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी फळछाटणीचे केलेले नियोजन कोलमडले आहे. सातत्याने वातावरण बदलत आहे. परिणामी फळछाटणीला ब्रेक लागला आहे. द्राक्ष छाटणीच्या कामाला वेग आला होता परंतु परतीच्या पावसाचे संकट ओढावले आहे. या पावसामुळे रोगाचा प्रादुर्भाव होण्यास मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात तिपटीने वाढ झाली आहे. राज्य सरकारने प्रत्येक गावात पर्जन्यमापक यंत्रे बसविली तरच शेतकऱ्यांना थोडाफार दिलासा मिळेल.

– **आशिष काळे,** द्राक्ष बागायतदार संघ माजी अध्यक्ष, सोलापूर

### पर्जन्यमान मोजण्यासाठी यंत्रे वाढविण्याची गरज

जिल्ह्यातील पर्जन्यमान ठरविण्यासाठी तालुक्यातील मंडळात पडलेल्या पावसाची सरासरी हा तालुक्याचा एकूण पाऊस धरला जातो. तालुक्याच्या सरासरी पावसाच्या नोंदी जिल्हाधिकारी कार्यालयात पाठविल्या जातात. त्यावरून राज्याचे धोरण ठरविले जाते. पाऊस मोजण्याची ही पध्दत केवळ आपल्या जिल्ह्यातच नव्हे; तर संपूर्ण राज्यात वर्षानुवर्षे तशीच सुरू आहे.



## मैंदर्गी कन्नड मुलींच्या शाळेत विद्यार्थ्यांनी बनवले आकाश दिवे

**सुराज्य/अक्कलकोट** : दिवाळीच्या सणानिमित्त लागणारे आकाश दिव्यासाठी मैंदर्गी कन्नड मुलींच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी लागणारी साहित्य शाळेकडून पुरविण्यात आले होते. तेव्हा सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात भरभरुन सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकर्षक आकाश दिवा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरासमोर लावण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक शिक्षकांच्या घरात व शाळेत लावण्यासाठी मुलींनी आकाश दिवा बनवून दिल्या. बाजारात तीनशे ते चारशे रुपयांपर्यंत मिळणारे आकाश दिवा शाळेच्या प्रशिक्षणात केवळ तीस ते चाळीस रुपयांमध्ये तयार करण्यात आले. पालकांना होणारे अधिक खर्च यामुळे वाचले. या प्रशिक्षणला केंद्र प्रमुख श्रीशैल हडलगी, मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी, सहशिक्षक सुरेखा मसुती, गीता शिवणगी, विजया नाडगौडा, गुरुलिंगप्पा शिवनगी, रमेश जुजगार, विजयालक्ष्मी भैरामडगी, सुप्रिया बिराजदार, सिमा हिरतोट यांच्या सह शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेश पाटील यांनी सहकार्य केले.



## लक्ष्मीनगर शाळेतील चिमुकल्यांनी बनविले आकर्षक आकाश कंदील

**सुराज्य/पिलीव** : कुसमोड (ता. माळशिरस) येथील जि.प. लक्ष्मीनगर येथील जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्यांनी पर्यावरण पुरक असे आकर्षक आकाश कंदील बनविले आहेत. दिपावली म्हणजे लहान मुलांसाठी आनंदाची पर्वणी व उत्साहाचा सण. दिपावली साठी मोठ्या प्रमाणात रेडीमेड खरेदी करण्यावर भर असतो. किल्ले, फटाके, आकर्षक आकाश कंदील बाजारातुन विकत आणले जातात पण मुलांमध्ये अश्या प्रकारची कला लहानपणासुनच अवगत व्हा वी तसेच लहानपणापासून च विदयार्थ्यांनमधे कलागुणांना वाव मिळावा म्हणुनच या शाळेत मुख्याध्यापक सुहास कोल्हे व सहशिक्षक सुनील डुरे हे विदयार्थ्यांना प्रेरणा देतात. या शाळेत स्वच्छ शाळा सुंदर शाळा, संगणक कक्ष, वृक्ष लागवड, अदयावत व प्रशस्त क्रिडांगण, यामुळे ही शाळा पिलीव केंद्रात नेहमीच अग्रेसर आहे. याविषयी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रा संजय पाटील यांनी सांगीतले की याठिकाणी असणारे विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या सहकार्यामुळे विदयार्थ्यांनची गुणवत्ता चांगली आहे तसेच वेगवेगळे उपक्रम राबवुन या शाळेने निश्चित च आदर्श निर्माण केला आहे.

## आनंद साठे उपाध्यक्षपदी निवड

**सुराज्य/सोलापूर** : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष उमेश्चंद्र चिलबुले, सरचिटणीस संजय महालकर, विभागीय सहसचिव रमाकांत साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे यांच्या हस्ते सोलापूर जिल्हा शाखेच्या उपाध्यक्षपदी आनंद साठे यांची निवड करण्यात आली. यावेळी रमेश कोळी, दिनेश बनसोडे, सचिन मायनाळ, यशवंत वलेकर, हनुमंत भोसले, सुरेश राठोड, आर सी लोखंडे, आकाश बडवे, अनिल गुंड, प्रमोद धावड, दीपक वाघमारे, अमोल धाकपाडे, ग्रामसेवक युनियन चे शरद भुजबळ, डी एम पाटील, विस्तार अधिकारी संघटनेचे संदीप खरबस, लिपीक वर्गीय संघटनेचे पांडुरंग कविटकर, तजमूल मुतवल्ली, सचिन सोनकांबळे, संतोष शर्मा, विजय कुलकर्णी, सागर शेंडगे, आरोग्य कर्मचारी युनियन चे निर्मल पवार, पवार, विष्णू सानेपागुल, हनुमंत कोळी नर्सेस संघटनेचे सुनंदा सुरवसे, सुरेखा जवळकर, कृषी तांत्रिक संघटनेचे सचिन चव्हाण, लेखा संघटनेचे गुरुनाथ जाधव, अनंत माने, रवि लिगाडे, महेश भोसले, जमीर शेख, मैल मजूर संघटनेचे कानिफनाथ चव्हाण, पांडुरंग शिंदे उपस्थित होते.



## युवा उद्योजक चव्हाण यांना बिझनेस ॲवार्ड

### सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते वितरण

**सुराज्य/माढा**

माढा तालुक्यातील सीना नदीकाठी वसलेल्या केवड सारख्या अगदी छोट्या गावांमध्ये वेगवेगळे उद्योग करत उद्योजक म्हणून नावारूपाला आलेल्या गणेश चव्हाण यांना रिसेल इन इंडिया यांच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्र बिजनेस अवॉर्ड २०२२ (उद्योजक पुरस्कार) नुकताच जाहीर झाला असून नाशिक येथे ६ नोव्हेंबर रोजी या पुरस्काराचे वितरण प्रसिध्द सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे.

या पुरस्काराबद्दल मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव गणेश चव्हाण यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



सोलापूर जिल्ह्यातील पहिला लाकडी घाणा उभारून तेल उत्पादनाचा गंधर्व ऑईल इंडस्ट्रीज या नावाने प्रयोग यशस्वी केला गुणवत्तापूर्ण आणि आरोग्याला फायदेशीर किमतीमध्ये किफायतशीर असणाऱ्या या तेलाला आयएसओ मानांकन मिळाले असून या प्रयोगाच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनाला एक हक्काची बाजारपेठ मिळाली आहे.

पूर्वीच्या लाकडी घाण्याचा प्रयोग आधुनिक पध्दतीने गणेश चव्हाण यांनी केला. आणि पाहता पाहता या तेलाची लोकप्रियता सर्वत्र पसरली. करडई जवस शेंगदाणा तीळ यासारख्या विविध तेलबियापासून शुध्द आणि आरोग्यपूर्ण अशा तेलाची निर्मिती करून लोकांच्या आरोग्याची काळजी घेत एक यशस्वी उद्योजक म्हणून चव्हाण नावारूपाला आले आहेत.

आरोग्यपूर्ण आहार व केमिकल विरहित जीवनशैलीचे प्रणेते कृषिरत्न पद्मभूषण डॉ विजय भटकर या थोर वैज्ञानिकाच्या आरोग्याच्या कसोट्या गंधर्व ऑइल इंडस्ट्रीज ने पार केल्या आहेत. या सर्व बाबींची दखल घेतली गेल्यानेच उद्योजक गणेश चव्हाण यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. नाशिक येथे सहा नोव्हेंबर रोजी प्रसिध्द अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते समारंभ पूर्वक पुरस्कार वितरण होणार आहे.

## रेशन दुकानदार संघटनेच्या अक्कलकोट तालुकाध्यक्षपदी चौधरी

**सुराज्य/अक्कलकोट** : अक्कलकोट तालुका रास्त भाव स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी संगोगी (ब) चे राजशेखर गुरुलिंगप्पा चौधरी यांची बिनविरोध निवड तर उपाध्यक्षपदी विनायक होटकर यांची निवड करण्यात आली.



रास्त भाव स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्यावतीने नूतन कार्यकारिणी निवडी संदर्भात सोलापूर जिल्हा अध्यक्ष सुनील पेंटर यांच्या अध्यक्षतेखाली अक्कलकोट येथे बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत नूतन अध्यक्ष म्हणून राजशेखर गुरुलिंगप्पा चौधरी यांची तर उपाध्यक्षपदी विनायक होटकर व इतर कार्यकारिणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. यावेळी माजी तालुकाध्यक्ष दिलीप काजळे, सेक्रेटरी जन्मेंजय होटकर, मैंदर्गी शहर अध्यक्ष शिवचलप्पा चव्हाण, दुधनी शहराध्यक्ष मल्लिनाथ ढंगापुरे, तडवळ सर्कल चे नागनाथ रेवुरे, वागदरीचे रविकिरण वरनाळे, जेऊर सर्कलचे हिरालाल राठोड, अक्कलकोट शहर सर्कलचे घुडुभाई शेख, करजगीचे इरय्या विभुते, नागणसूरचे प्रचंडे उपस्थित होते.

## मैंदर्गीत ११ ते २० नोव्हेंबरपर्यंत प्रवचन

**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथे दि ११ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२२ पर्यंत दररोज सायंकाळी सहा ते साडेसात वाजेपर्यंत शिवचलेश्वर देवस्थान मैदानावर मैंदर्गीत कोप्पळ जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय प्रवचनकार सुप्रसिध्द म नि प्र अभिनव गवी सिध्देश्वर महास्वामीजी यांचे आध्यात्मिक प्रवचन कार्यक्रम होणार आहे.

हा प्रवचन कार्यक्रम जवळपास दहा दिवस चालणार असून, त्या दरम्यान दररोज सकाळी साडेसहा ते आठ वाजेपर्यंत मैंदर्गी परिसरातील जवळपास सात गावात प्रभात फेरी निघणार आहे. यात दुधनी, संगोळगी (ब), मादनहिप्परगा, बोरी उमरगे, सलगर, हतीकणबस, उडगी सह आदी गावात पादयात्रा निघणार आहे यात विविध मठाचे महास्वामीजींचे देखील समावेश असणार आहे. आजूबाजूच्या गावात दररोज भजनी मंडळ समवेत प्रभात फेरी होणार आहे. महास्वामीजींना निमंत्रण देण्यासाठी मैंदर्गी शहरातील जवळपास दिडशे लोकांनी कोप्पळ येथे जाऊन विनंती केली आहे. मैंदर्गी नागरिकांच्या विनंतीला मान देत महास्वामीजींनी निमंत्रण स्वीकारले आहे. महास्वामीजी निमंत्रण स्वीकारल्याने मैंदर्गी शहर व परिसरातील गावातील ग्रामस्थांमध्ये उत्साहा संचारला आहे. आता संपूर्ण मैंदर्गी शहर महास्वामीजींच्या प्रवचन कार्यक्रमाच्या तयारीला लागली आहे. महास्वामीजींचे विचार ऐकण्यासाठी पाच-पाच वर्षे वाट पहावी लागत आहे. कोप्पळ येथील नियोजन समितीचे प्रमुखांनी मैंदर्गी शहरात येऊन जवळपास दिडशे लोकांची बैठक घेतली आहे. मैंदर्गी शहरातील मुख्य ठिकाणांची पाहणी करुन सर्वांनुमते प्रवचनासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. या प्रवचन कार्यक्रमासाठी जागेची पाहणी करताना अक्कलकोट, मादनहिप्परगा, अणदूर, गुलबर्गासह आदी ठिकाणच्या महास्वामीजी उपस्थित होते.



हा प्रवचन कार्यक्रम समस्त मैंदर्गी शहरवासियांनी आयोजित केली आहे. प्रवचन साठी जागा निश्चित केली असून, महास्वामीजींचे प्रवचन ऐकण्यासाठी महाराष्ट्र व कर्नाटकातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. अक्कलकोट तालुक्यातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहून महास्वामीजींच्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन नियोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रताप क्रीडा मंडळाने सामाजिक सेवाभाव जपला : जयसिंह

**सुराज्य/अकलूज**

कला, क्रिडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रताप क्रीडा मंडळाने ना नफा, ना तोटा या तत्त्वावर व उत्कृष्ट गुणवत्तेसह रत्नाई मिठाई केंद्र हा सामाजिक जबाबदारी घेऊन सुरू केलेला उपक्रम आहे. याचा समाजाला निश्चितच फायदा होईल नेहमीच प्रताप क्रीडा मंडळाने सामाजिक सेवाभाव जपला आहे असे मत या मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

शंकरनगर येथे प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने खास दीपावली निमित्त ना नफा, ना तोटा या तत्त्वावर व उत्कृष्ट गुणवत्ते सह रत्नाई मिठाई वाटप स्टॉल केंद्राचे उद्‌घाटन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रताप क्रीडा मंडळाच्या विद्यमान अध्यक्षा कु स्वरूपाराणी मोहिते पाटील, अकलूज विविध कार्यकारी सोसायटीचे लक्ष्मणराव आसबे, मंडळाचे उपाध्यक्ष प्रतापराव पाटील, सचिव पोपटराव भोसले पाटील, खजिनदार वसंतराव जाधव, संचालक यशवंतराव माने देशमुख, संग्राम रणनवरे, बिभिशण जाधव, राजेंद्र देवकर, आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व स्वर्गीय श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. तर मिठाई नोंदणी केलेल्यांना यावेळी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते मिठाई किटचे प्राथमिक स्वरूपात वाटपही करण्यात आले. मिठाई तयार करणारे मदन महाराज यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. रत्नाई मिठाई स्टॉल हा दिनांक १९ ते २१ ऑक्टोबर २०२२ सायंकाळ पर्यंत सुरू राहणार असून याचा सर्वांनी लाभ घेण्याचे आवाहनही सचिव पोपटराव भोसले-पाटील यांनी केले. सूत्रसंचालन आर आर पाटील यांनी केले तर आभार खजिनदार वसंतराव जाधव यांनी मानले.

प्रताप क्रिडा मंडळाने आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नसतानाही सन १९८२, १९८४, व १९८५ या काळात राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्त राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धाचे यशस्वी आयोजन केले होते. त्याच पध्दतीने पुढील वर्षी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करावे. आत्ताची तरुण पिढी ही मोबाईल, आणि टीव्हीमध्ये व्यस्त असल्याचे चित्र आहे. या विद्यार्थ्यांना मैदानाची आवड निर्माण व्हावी, त्यांना वेगवेगळ्या खेळाची माहिती मिळावी यासाठी प्रताप क्रिडा मंडळाने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धाचे आयोजन करावे असे मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.

सुराज्य सोलापूर
**Classified**

**विवाह विषयक**

● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 7387906921
(121122)

**पाहिजे**

● श्री. तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर येथील कार्यालयात १ स्मार्ट लेडीची आवश्यकता (फोनवर माहिती सांगण्यासाठी) आहे. शिक्षण किमान १२ वी आवश्यक, अपेक्षित पगार दिला जाईल. गरजूंनी संपर्क साधावा.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 8378851719
(261022)

## नाभिक समाजाच्यावतीने आ. भास्कर जाधव यांचा निषेध

### किशोर साळुंखे यांचा आंदोलनाचा इशारा

**सुराज्य/नातेपुते**

आमदार भास्कर जाधव यांनी नारायण राणे यांच्यावर टीका करताना नाभिक समाजावरती अप शब्दाचा वापर केला आहे या विषयावर विचार मंथन म्हणून नातेपुते येथे नाभिक संघटनेच्या वतीने बैठक घेण्यात आली.



या बैठकीमध्ये आमदार भास्कर जाधव यांनी केलेल्या वक्तव्याबाबत नाभिक समाजाचे माळशिरस तालुका अध्यक्ष किशोर साळुंखे तसेच अनेक पदाधिकारी व नाभिक समाजाच्या वतीने जाहीर निषेध केला तसेच आमदार भास्कर जाधव सकल नाभिक समाजाची माफी मागत नाहीत तोपर्यंत व्यापक आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेल्या बैठकीत राष्ट्रीय नाभिक संघटनेच्या वतीने घेण्यात आला. यावेळी माळशिरस तालुकाध्यक्ष किशोर साळुंखे नवनाथ राऊत सुदाम जाधव योगेश जाधव निलेश शिंदे शिवाजी कोरटकर धर्मराज खंडागळे रणजीत खंडागळे लक्ष्मण राऊत विकी क्षीरसागर पवन शिरसागर अजिंक्य खंडाळे तसेच संघटनेचे पदाधिकारी व नाभिक समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिलेल्या शब्दाप्रमाणे गळीतास आलेल्या उसाची एफआरपी अदा : पाटील

**सुराज्य/मंगळवेढा**

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे गळीत हंगाम सन २०२१-२२ मध्ये गळीतास ऊस पुरवठा केलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे एफ आर पी ची उर्वरित रक्कम रु ११० ८९ प्र मे टन प्रमाणे एकुण रक्कम रु ४ २७ कोटी संबंधीत शेतकऱ्यांचे धनश्री महिला पतसंस्था मंगळवेढा यांचे सर्व शाखातील खात्यावर वर्ग केले आहे. कारखान्याचे गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी दिलेल्या शब्दाप्रमाणे हंगाम सुरु करण्यापूर्वी मागील ऊस बिलाची एफ आर पी पुर्ण केली आहे तरी सर्व ऊस उत्पादक सभासद-शेतक-यांनी आपला ऊस दामाजी कारखान्यास देवून सहकार्य करण्याचे आवाहन चेअरमन शिवानंद पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

विद्यमान संचालक मंडळाने मागील हंगाम २०२१-२२ मधील हंगाम अखेरचे कालावधीतील कार्यक्षेत्रातील सभासद व कार्यक्षेत्राबाहेरील गेटकेन शेतकऱ्यांचे संपुर्ण ऊसाचे बिल रु २१००/- प्रती मेट्रिक टन प्रमाणे एकूण रक्कम रुपये ८कोटी ७५ लाख धनश्री महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, मंगळवेढा व पतसंस्थेच्या सर्व शाखामध्ये यापूर्वीच वर्ग केले आहे. तसेच मागील गळीत हंगामाचे उर्वरित ऊस तोडणी वाहतुक फायनल बिल रु १, ६४, ३२, ४७०/- यापूर्वी जिजामाता महिला पतसंस्था, मंगळवेढा येथे संबंधीत ठेकेदारांचे खात्यावर जमा करणेत आले आहे. अशा प्रकारे मागील संचालक मंडळाचे काळात गळीतास आलेल्या ऊसाचे बिलापोटी यापूर्वी रु २१००/- प्रमाणे राहिलेली बिले अदा केली आहेत. तसेच एफ आर पी पूर्ण करण्यासाठी उर्वरित ऊस बिल रु ४२७ शेतकऱ्यांच्या धनश्री पतसंस्थेतील बँक खात्यावर वर्ग केले असलेचे व्हाईस चेअरमन तानाजी खरात यांनी सांगीतले.




सध्या सर्वत्र मोठया प्रमाणात झालेल्या पावसामुळे सर्वच कारखान्यांचा हंगाम सुरु करणेस विलंब होत आहे अशा परिस्थितीत आपले कारखान्याची ऊस तोडणी वाहतुक यंत्रणा सध्या कारखाना साईटवर आली असुन शेती विभागामार्फत ऊसतोडणी प्रोगाम तयार केला आहे. आजपासुन ऊसतोडणीच्या शेजा देण्यात आल्या आहेत तसेच कारखाना गळीतासाठी तयार असुन उद्यापासुन पुर्ण क्षमतेने नॉनस्टॉप कारखाना चालु करणार आहोत. या हंगामामध्ये ६ ०० लाख मे टन गाळपाचे संचालक मंडळाने उद्दिष्ट ठेवलेले आहे संचालक मंडळाने ठेवलेले उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी कारखान्याचे सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, कर्मचारी उत्सुक असलेचे कार्यकारी संचालक सुनिल दळवी यांनी सांगीतले

याप्रसंगी कारखान्याचे संचालक प्रकाश पाटील, औदुंबर वाडदेकर, मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणु पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, ऊस उत्पादक सभासद-शेतकरी, तोडणी वाहतुक ठेकेदार, सिझन कामाचे कंत्राटदार, कारखान्याचे खातेप्रमुख, विभागप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते

## ...तरीही ईडीकडून झालेल्या अटकेला रोखता येणार नाही : सर्वोच्च न्यायालय

**सुराज्य/नवी दिल्ली** : तृणमूलचे आमदार आणि पश्चिम बंगाल प्राथमिक शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष माणिक भट्टाचार्य यांना पश्चिम बंगाल शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा झटका बसला आहे. प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्तींमधील कथित अनियमिततेशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीच्या अटकेला आव्हान देणारी भट्टाचार्य यांची याचिका सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळून लावली.

प्राथमिक शिक्षक भरती घोटाळ्यात माणिक यांना सीबीआयने समन्स बजावले होते, त्यानंतर त्यांनी प्रथम कोलकाता उच्च न्यायालयात अपील केले होते आणि तेथून दिलासा न मिळाल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सुप्रीम कोर्टाने भट्टाचार्य यांच्या याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर ३० सप्टेंबरला आपला निर्णय राखून ठेवताना अटकेपासून वाढीव संरक्षणाची सीबीआयची मागणी देखील मान्य केली आणि पुढील आदेशापर्यंत अंतरिम संरक्षण देऊन तपासात सहकार्य करण्यास सांगितले.

## जिहाद वक्तव्यावरुन महाभारत

**सुराज्य/नवी दिल्ली** : जिहाद ही संकल्पना केवळ इस्लाममध्ये नसून भगवद्गीता आणि ख्रिश्चन धर्मातही आहे, असे विधान ज्येष्ठ काँग्रेस नेते शिवराज पाटील यांनी केले. काँग्रेसच्या नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री मोहसिना किडवई यांच्या चरित्राचे प्रकाशन सोहळयात ते बोलत होते. भाजपने या विधानावर जोरदार टीका केली आहे.

माजी लोकसभा अध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री पाटील म्हणाले की, 'इस्लाम धर्मात असलेल्या जिहाद या संकल्पनेबाबत अनेकदा बोलले जाते. हेतू चांगला असेल, काही चांगले करायचे असेल आणि ते कुणी मान्य करत नसेल तर बळाचा वापर केला जाऊ शकतो, अशी ही संकल्पना आहे. केवळ कुराणच नव्हे, तर महाभारतातील गीतेमध्ये आणि ख्रिश्चन धर्मातही हेच सांगितले आहे.' या विधानावरून भाजपने काँग्रेसला लक्ष्य केले आहे. काँग्रेसने भगवा दहशतवाद संकल्पनेला जन्म दिला, राममंदिराला विरोध केला, प्रभू रामचंद्राच्या अस्तित्वावर संशय घेतला, हिंदूत्वाची तुलना आयसिसशी केली' असे ट्विट भाजप नेते शहेजाद पुनावाला यांनी केले.

## देशमुखांची दिवाळीही तुरुंगात

**सुराज्य/मुंबई** : कथीत १०० कोटी वसुली प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख गेल्या ११ महिन्यांपासून तुरुंगात आहेत. या प्रकरणी सीबीआय आणि ईडी दोघांनीही त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. काही दिवसांपूर्वीच 'ईडी'च्या गुन्ह्यांमध्ये देशमुखांना जामीन मिळाला होता. मात्र, याच प्रकरणात त्यांच्यावर सीबीआयनेही गुहा दाखल केला असल्याने त्यांच्या तुरंगात राहावे लागले होते. मात्र, आज सीबीआय कोर्टाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे त्यांची यंदाची दिवाळीही तुरुंगातच जाणार आहे.

## परतीच्या पावसाचे राज्यभरात थैमान

**सुराज्य/मुंबई** : राज्याच्या अनेक भागांत जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. विजांचा कडकडाटासह मुसळधार पाऊस जोरदार बॅटींग करत आहे. विशेष म्हणजे हा परतीचा पाऊस असून या पावसाने राज्याला चांगलंच झोडपून काढले आहे. पावसाचे पाणी शेतात साचल्याने पिकांची नासाडी झाली आहे. सर्वाधिक नुकसान हे सोयाबीन आणि कापसाच्या पिकाचे झाले आहे. कोकण, प. महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भासहित मराठवाड्यातील जिल्ह्यात पावसाने जोरदार बॅटिंग केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला आहे.

# महाविकास आघाडीच्या नेत्यांची डोकेदुखी वाढणार?



### सीबीआयबाबत शिंदे-फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

**सुराज्य/मुंबई**

**महाविकास आघाडीला धक्का देत राज्य सरकारने केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयला महाराष्ट्रात चौकशीसाठी आवश्यक असलेली 'जनरल कॅसेन्ट' पुन्हा बहाल केली आहे. उद्धव ठाकरे हे राज्याच्या मुख्यमंत्रिपदी असताना त्यांनी २१ ऑक्टोबर २०२० रोजी सीबीआयला राज्यात तपास करण्यासाठी राज्य सरकारची परवानगी घेणं आवश्यक असल्याचा निर्णय घेतला होता. ठाकरे सरकार सत्तेत असताना परवानगीशिवाय राज्यात सीबीआयला तपासाचे अधिकार नव्हते. काही महिन्यांपूर्वी महाविकास आघाडी सरकार पायउतार झाल्यानंतर आता या निर्णयात पुन्हा बदल करण्यात आला आहे.**

---

शिंदे-फडणवीसांनी घेतलेल्या निर्णयानंतर आता सीबीआयला राज्यात चौकशीसाठी सरकारच्या परवानगीची आवश्यकता लागणार नाही. सरकारच्या या निर्णयामुळे सीबीआय आता कोणत्याही प्रकरणाची चौकशी करू शकतं. हा निर्णय महाविकास आघाडीसाठी मोठा धक्का मानला जात आहे. कारण आमच्या नेत्यांची जाणीवपूर्णक आणि राजकीय सूडबुद्धीतून सीबीआयचा वापर करून चौकशी केली जात असल्याचा आरोप महाविकास आघाडीतील शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने केला होता.

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात सीबीआयने तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यासह अनेक मोठ्या नेत्यांची चौकशी करत कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली होती. त्यामुळेच मग सरकारने आपले अधिकार वापरत सीबीआयच्या महाराष्ट्रातील एण्ट्रीवरच मर्यादा घातल्या.

मात्र, आता शिंदे-फडणवीस सरकारने घेतलेल्या नव्या निर्णयानंतर सीबीआयसाठी महाराष्ट्राची दारे पुन्हा खुली झाली आहेत.

## धक्कादायक! तीन सफाई कामगारांचा चेंबरमध्ये गुदमरून मृत्यू



### पुण्यातील वाघोलीची घटना

**सुराज्य/पुणे**

पुण्यात शुक्रवारी सकाळी एक दुर्दैवी घटना घडली. वाघोली येथे एका सोसायटीचे ड्रेनेजचे चेंबर साफ करत असताना ३ सफाई कर्मचाऱ्यांचा गुदमरून मृत्यू झाला. पुण्यातील वाघोली सोसायटीत ही दुर्दैवी घटना घडली. घटना शुक्रवारी सकाळी ६ च्या सुमारास घडली. घटनास्थळी पीएमआरडी अग्निशामक दलाचे बचाव पथक पोहचले असून तिघांचे मृतदेह चेंबरच्या बाहेर काढण्यात आले आहे. नितीन प्रभार गोंड (वय ४५), गणेश भालेराव (वय २८, फकिर बाबा वस्ती, नांदेड), सतीशकुमार चुडाहरी (वाघोळी, डोमखेल वय ३५) अशी या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या तीन सफाई कर्मचाऱ्यांची नावे आहेत. चेंबरमध्ये असलेल्या विषारी वायुमुळे तिघेही बेशुद्ध झाले होते. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलिस तातडीने हे घटनास्थळी पोहचले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तिघांना बाहेर काढले. मात्र, त्यांचा मृत्यू झाला होता

## राऊतांची दिवाळी जेलमध्येच जाणार

### पुढील सुनावणी २ नोव्हेंबरला



**सुराज्य/मुंबई**

**पत्राचाळ गैरव्यवहार प्रकरणात अटकेत असलेले शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या जामीन अर्जावर आता २ नोव्हेंबरला सुनावणी होणार आहे. त्यामुळे संजय राऊत यांची दिवाळी तुरुंगातच जाणार असल्याचं स्पष्ट झालंय. पर्यायाने त्यांच्या न्यायालयीन कोठडीतील मुक्काम आणखी १५ दिवसांनी वाढला आहे. आज झालेल्या सुनावणीत ईडीच्या वकिलांनी आपल्याला आणखी युक्तवाद करायचा आहे, असं कोर्टाला सांगितलं. त्याची नोंद घेत कोर्टाने २ नोव्हेंबरपर्यंत सुनावणी स्थगित केली आहे. कारण पुढचा आठवडा दिवाळीमुळे कोर्टाचं नियमित कामकाज बंद असेल.**


संजय राऊत यांना पत्राचाळ गैरव्यवहार प्रकरणात ३१ जुलै रोजी अटक करण्यात आली. त्यानंतर पोलिस कोठडी आणि नंतर त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत झाली. सुरुवातीपासूनच राऊतांचा या घोटाळ्याशी कसलाही संबंध नाही, असा युक्तिवाद त्यांच्या वकिलांनी केलाय. तर राऊत हेच या घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार कसे आहेत, हे ईडीचे वकिल कोर्टाला पटवून देत आहेत.

दरम्यान, ७ सप्टेंबर रोजी राऊतांनी विशेष पीएमएलए कोर्टात जामीनासाठी अर्ज केला. मात्र, तेव्हापासून कोर्टाची तारीख पे तारीख सुरु आहे. राऊतांना दिलासा मिळताना दिसत नाहीये. राऊतांच्या जामीन अर्जावर ११ ऑक्टोबरला सुनावणी झाली होती. मात्र, वेळेअभावी त्यांचा युक्तिवाद पूर्णपण होऊ शकला नव्हता. त्यामुळं सुनावणी १७ ऑक्टोबरला घेण्याचे सांगितले होते. मात्र, पुन्हा एक दिवसाने सुनावणी पुढे ढकलत १८ ऑक्टोबरला घेण्याचा निर्णय घेतला होता. ती ही सुनावणी पूर्ण होऊ शकलेली नव्हती. आज पुन्हा सुनावणी झाली. पण ईडीच्या वकिलांच्या युक्तिवादाची नोंद घेत न्यायालयाने राऊतांच्या जामीन अर्जावर २ नोव्हेंबरला सुनावणी घेणार असल्याचं स्पष्ट केलं.

## कोरोनाच्या दहा कोटी लशी वाया गेल्या

### 'सीरम'चे आदर पूनावाला यांची माहिती

**सुराज्य/पुणे**



देशातील कोरोनाच्या साथीच्या संसर्गाची तीव्रता कमी झाली. त्यामुळे नागरिकांनी लसीकरणाकडे पाठ फिरवली असून, परिणामी मुदतबाह्य झालेल्या दहा कोटी लशी वाया गेल्या आहेत,' अशी माहिती सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांनी पत्रकारांना दिली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कोव्हिशिल्ड लशीचे उत्पादन 'सीरम'कडून करण्यात येत होते. संसर्गाची तीव्रता कमी झाल्याने गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये कोरोना प्रतिबंधक 'कोव्हिशिल्ड' लशीचे उत्पादन थांबविण्याचा निर्णय घेतला. कोरोना प्रतिबंधक लशीपेक्षा 'स्वाइन फ्लू'च्या लसीकरणाविषयी अधिक उदासिनता होती.

'स्वाइन फ्लू'च्या सुरुवातीलाच आम्ही लस विकसित केली होती; परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही. आपल्याकडे फ्ल्यूचा आजार किरकोळ समजला जातो. त्यामुळे देशात फ्ल्यू लसीकरणाची गरज वाटत नाही. दर दोन वर्षांनी नागरिकांनी करोनासह फ्ल्यूची लस घ्यावी लागेल,' असे पूनावाला यांनी सांगितले.

## धर्माच्या नावावर आपण कोठे पोहोचलो? हेट स्पीच'बद्दल सुप्रीम कोर्टाला चिंता

**सुराज्य/ नवी दिल्ली**



द्वेषपूर्ण भाषणांबद्दल (हेट स्पीच) सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली आहे. धर्माच्या नावावर आपण कोठे पोहोचलो आहोत. विशेषत:, लोकशाही आणि धर्म-तटस्थ देशात अशा प्रकारची वक्तव्ये होत आहे, हे त्रस्त करणारी बाब आहे, असे मत न्ययालयाने व्यक्त केले. त्याचबरोबर द्वेषपूर्ण भाषण करणाऱ्यावर तत्काळ कठोर कारवाई करण्याची गरज आहे, असे मतही न्यायालयाने व्यक्त केले.

द्वेषपूर्ण भाषणावर अंकूश लावण्यासंदर्भातील ११ रिट याचिकांवर न्यायमूर्ती के. एम. जोसेफ आणि न्यायमूर्ती हृषिकेश रॉय यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. भारतातील मुस्लीम समाजाला लक्ष्य करून दहशत निर्माण करण्याच्या कथित वाढत्या धोक्याला आळा घालण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी या याचिकांमध्ये करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड पोलिसांना नोटिसा बजावल्या आहेत. तसेच आपल्या कार्यक्षेत्रातील अशा गुन्ह्यांविरोधात केलेल्या कारवाईचा अहवाल तयार करण्यास न्यायालयाने सांगितले.

औपचारिक तक्रारींची वाट न पाहता हेट स्पीच प्रकरणांची स्वत:हून दखल घेण्याचे आदेश न्यायालयाने सर्व राज्य सरकार तसेच पोलीस अधिकाऱ्यांना दिले. अशी कारवाई झाली नाही तर, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात न्यायालयाची अवमानना समजण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले. धर्म कोणता आहे याची पर्वा न करता कारवाई केली पाहिजे. देशात द्वेषाचे वातावरण पसरले आहे. अशी विधाने अस्वस्थ करणारी आहेत आणि ते सहन करता येणार नाहीत, असे न्यायालयाने म्हटले आहे.

### फडणवीस अन् शिंदेंसोबत येणार एकाच मंचावर

## संतप्त नागरिकांनी थेट आयुक्तांच्या अंगावर फेकले गटाराचे पाणी




**सुराज्य/नाशिक**

**नवीन बस स्थानक ते दरेगाव या रस्त्याच्या दुरवस्थेला कंटाळलेल्या नागरिकांच्या संतापाच्या उद्रेकाचा सामना पालिका आयुक्त भालचंद्र गोसावी यांना गुरुवारी (दि. २०) करावा लागला. आमदार मौलाना मुफ्ती इस्माइल यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनात काही संतप्त आंदोलकांनी थेट आयुक्तांच्या अंगावर घाण पाणी फेकल्याने एकच खळबळ उडाली. अखेर तातडीने रस्त्याच्या डागडुजीचे काम सुरू करण्यात आल्यानंतर आंदोलक मागे घेण्यात आले.**

---

शहरातील जुन्या आग्रा रोडचे काँक्रिटीकरणाचे काम गेल्या कित्येक दिवसांपासून रखडले आहे. या रस्त्याचे तीन टप्प्यांत काम होणार असून देवीचा मळा ते दरेगाव या तिसऱ्या टप्प्याचे काम निविदा प्रक्रियेत आहे. परंतु काम रखडल्याने रस्त्यावर खड्डे पडले आहेत. अरुंद रस्ता, बेशिस्त वाहतुकीचा सामना करीत नागरिक जीव मुठीत घेऊन प्रवास करतात. महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी आमदार मौलाना मुफ्ती यांनी गुरुवारी आंदोलन केले.



## नगरमध्ये शेकडो किलो कांदा पाण्यात!

**सुराज्य/अहमदनगर**

**अतिवृष्टीमुळे राज्यभरात शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं असून मोठ्या कष्टाने वाढवलेली पिके डोळ्यांदेखत पाण्याखाली गेली आहेत. मात्र, या पावसाचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच बसला, असं नाही. कोपरगाव तालुक्यात याचा फटका व्यापाऱ्यांनाही बसला आहे. टाकळी रस्त्यालगत काही व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांचा खरेदी केलेला कांदा साठवून ठेवला होता. बुधवारी मध्यरात्री कोपरगाव तालुक्यात अतिवृष्टी झाली. त्यामुळे अचानक आलेल्या पाण्यामुळे या शेडमधील व्यापाऱ्यांचा कांदा पाण्यात वाहून गेला. परिणामी व्यापाऱ्यांचे मोठं नुकसान झालं.**

पाण्याचा प्रवाह थांबल्यावर उरलेला कांदा पाण्यावर तरंगत होता. भिजलेला हा कांदा वाया गेल्याने व्यापाऱ्यांचे मोठं नुकसान झालं. यामुळे गुरूवारी कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कांद्याचे लिलावही बंद ठेवण्यात आले होते.

टाकळी रोडवरील या व्यापाऱ्यांना दोन वर्षांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीचाही तडाखा बसला होता. त्यावेळी मोठ्या प्रमाणात साठवलेला कांदा वाहून गेला होता. आता पुन्हा या कांदा व्यापाऱ्यांचे प्रचंड नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला कांदा वाहून गेला. तसंच सततच्या पाण्यामुळे साठवून ठेवलेला कांदा सडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कांद्याचे पैसे कसे द्यायचे, अशी चिंता आता या व्यापाऱ्यांना सतावत आहे. काहींनी स्वत:चे पैसे उपलब्ध करून शेतकऱ्यांना बिले दिली. मात्र, त्यांचा कांदा वाहून गेल्याने तोटा झाला आहे. ऐन दिवाळीत आलेल्या या संकटामुळे व्यापाऱ्यांची कोंडी झाली आहे.

## पाटलांची सत्ता खालसा, राष्ट्रवादीची चार मते फुटली

**सुराज्य/सांगली**

**सांगली लोकसभा मतदारसंघाचे भाजप खासदार संजय काका पाटील यांच्या गटाकडून राष्ट्रवादीचे दिवंगत नेते आर. आर. पाटील यांचे सुपुत्र रोहित आर. आर. पाटील यांच्या गटाला धोबीपछाड देण्यात आली. राष्ट्रवादीचे चार नगरसेवक फुटल्यामुळे कवठेमहंकाळ नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवाराचा विजय झाला. दहा महिन्यांपूर्वी कवठेमहांकाळ नगरपंचायत निवडणुकीमध्ये झालेल्या पराभवाचा वचपा खासदार पाटलांनी काढला.**

---

सांगली जिल्ह्यातील कवठेमहंकाळ नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादीचे बहुमत असूनही खासदार संजय काका पाटील गटाच्या सिंधुताई गावडे निवडणुकीत विजयी होऊन नगराध्यक्ष पदावर विराजमान झाल्या. यामुळे राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित पाटील यांना मोठा धक्का बसला आहे.

नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीकडून राहुल जगताप यांना उमेदवारी देण्यात आली होती, तर भाजपा खासदार व विरोधी गटाकडून सिंधुताई गावडे यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र निवडणुकीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे १० पैकी चार सदस्य फुटले, राष्ट्रवादीच्या चार सदस्यांनी गैरहजेरी लावल्याने संख्याबळ सहा झाले होते, मात्र विरोधातल्या घोरपडे गटाची दोन मतं ही राष्ट्रवादीला मिळाली. तर खासदार संजयकाका पाटील गटाला आठ मते मिळाली.

राहुल जगताप आणि सिंधुताई गावडे यांना प्रत्येकी आठ मते मिळाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी चिठ्ठीवर सोडत घेतली, ज्यामध्ये सिंधुताई गावडे निवडून आल्या. त्यामुळे नगराध्यक्ष निवडणुकीत भाजपच्या उमेदवाराचा विजय झाला असून राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित आर. आर. पाटील यांनी एकाकी झुंज देऊन दहा महिन्यांपूर्वी मिळवलेली सत्ता अखेर संपुष्टात आली.





दहा महिन्यांपूर्वी कवठेमहांकाळ नगरपंचायती निवडणुकीमध्ये रोहित आर आर पाटील यांनी भाजपा, काँग्रेस, शिवसेना आघाडीच्या पॅनलचा धुव्वा उडवत १७ पैकी १० जागा जिंकत एकहाती सत्ता मिळवली होती.

एका बाजूला भाजपाचे खासदार, माजी मंत्री आणि काँग्रेस-शिवसेनेचे दिग्गज नेते असताना रोहित पाटील यांनी विरोधकांना धोबीपछाड दिले होते. रोहित. आर. आर. पाटील यांच्या विजयाने संपूर्ण राज्यात त्यांचं कौतुक झालं होतं. मात्र आता त्याच नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष निवडणुकीत रोहित आर.आर.पाटील अर्थात राष्ट्रवादीला मोठा धक्का बसला आहे.





**दिवाळीनिमित्त बाजारपेठ सजली :** वर्षातील सर्वात मोठा सण दिवाळी केवळ दोन दिवसांवर आला आहे. त्यानिमित्त शहरातील सर्व बाजारपेठा सजल्या आहेत. आकाश कंदिल, पणत्या, रांगोळीसह इतर साहित्य बाजारपेठेत विक्रीस आले आहे.



## कार्तिकी एकादशीच्या शासकीय महापूजेसाठी उपमुख्यमंत्र्यांना निमंत्रण

**सोलापूर :** कार्तिकी शुध्द एकादशी निमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा संपन्न होणार आहे. शुक्रवार दि.०४ नोव्हेंबर, २०२२ रोजी कार्तिकी शुध्द एकादशी असून, आज गुरुवार दि. २० ऑक्टोबर, २०२२ रोजी मंत्रालय, मुंबई येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शासकीय महापूजेसाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने निमंत्रण देण्यात आले. मंदिर समितीचे सह अध्यक्ष ह.भ.प गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते वारकरी पटका, वीणा व श्रींची मूर्ती भेट देऊन निमंत्रण देण्यात आले. यावेळी आमदार बालाजी किणीकर, मंदिर समितीचे सदस्य श्रीमती शकुंतला नडगिरे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, माधवी निगडे, ह.भ.प शिवाजीराव मोरे, ह .भ. प प्रकाश जवजाळ, आचार्य तुषार भोसले, अप्पर जिल्हाधिकारी तथा मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी संजीव जाधव, व्यवस्थापक पुदलवाड उपस्थित होते.

## भाड्याने राहणाऱ्यांची माहिती पोलीस प्रशासनास द्या

**सोलापूर :** घरमालक, प्रॉपर्टी डिलर, ब्रोकर, एजंट जुने वाहन विक्री - खरेदी करणारे व्यक्ती व संस्था, भाड्याने वाहन देणारे व्यक्ती व संस्था तसेच धार्मिक स्थळांचे विश्वस्त व काळजीवाहक यांनी जिल्ह्यात नव्याने भाड्याने राहण्यास येणाऱ्या अनोळखी व्यक्तींची माहिती जवळच्या पोलीस ठाण्यात देण्यात यावी असे आदेश अप्पर जिल्हादंडाधिकारी शमा पवार यांनी दिले आहेत. देशात, राज्यात व महत्वाच्या शहरात दहशतवादी कारवायात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. दहशतवादी कारवाया करणारे दहशतवादी हे स्थानिक लोकांत मिसळून तात्पुरत्या स्वरूपात वास्तव्य करून घातपाती कारवायांना अंतिमरूप देतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मानवी व मालमत्तेचे नुकसान होत असून त्याचबरोबर अशा घटनांमुळे जनमाणसांमध्ये घबराटीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणाऱ्या घटना वारंवार घडत आहेत.




त्यामुळे जिल्ह्यात नवीन राहण्यासाठी येणारे व्यक्ती यांची माहिती असणे आवश्यक असून अशी माहिती संबंधित पोलीस स्टेशनला देणे गरजचे आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व घरमालक, प्रॉपर्टी डिलर, ब्रोकर, एजंन्ट जुने वाहन विक्री-खरेदी करणारे व्यक्ती व संस्था, भाड्याने वाहन देणारे व्यक्ती व संस्था तसेच धार्मिक स्थळांचे विश्वस्त व काळजीवाहक यांना कोणत्याही अनोळखी नवीन राहावयास येणाऱ्या व्यक्तींची व त्यांच्या वास्तव्यासंबंधीची संपूर्ण माहिती न चुकता संबंधित पोलीस स्टेशनला त्यांचे संबंधीची माहिती द्यावी, असे आदेश त्यांनी दिले.

# विकास सोसायट्यांनी दूध डेअरी सुरु करावी : रणजितसिंह शिंदे

## दूध संघाकडून दूध उत्पादकांसाठीच्या दरात ७० पैसे वाढ

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हा दूध संघाकडून वीस दिवसांपूर्वीच दूध उत्पादकांसाठी ३५ वरून ३६ रूपये दर वाढवून दिला होता. तर ऐन दिवाळीत पुन्हा त्यांना ७० पैसे दर वाढवून दिला असून सध्या तो ३६ रूपये ७० पैसे देण्यात येणार आहे. याचबरोबर विकास सोसायट्यांनी दूध डेअरी सुरू कराव्यात. त्यासाठी दूध संघाकडे अर्ज करावे. दूध संघाकडून सहकार्य केले जाईल, असे आवाहन दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी शुक्रवारी केले.

जिल्हा दूध संघाची बोर्ड मिटींग संघाच्या कार्यालयात शुक्रवारी, २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी त्यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना आवाहन केले. यावेळी दूध संघाचे मारूती लवटे, औदुंबर वाडदेकर, संभाजी मोरे, बाळासाहेब माळी, सुरेश हसापुरे, विजय येलपले, जयंत साळे, राजेंद्र मोरे, राजेंद्र पाटील, मनोज गरड, वैशाली शेंबडे, निर्मला काकडे, राजीव सगरोळीकर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी चेअरमन शिंदे म्हणाले, दूध संघाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी विविध सध्याच्या संचालक मंडळाकडून विविध उपाय योजना सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून टेंभूर्णी येथे ७० गाळे बांधण्यात येणार आहेत. यातील ४० गाळ्यांसाठी प्रत्येकी ३ हजार तर ३० गाळ्यांसाठी प्रत्येकी २ हजार रूपये भाडे ठरवण्यात आले आहे. तर प्रत्येक गाळ्यांसाठी २ लाख रूपये डिपॉझिट घेण्यात आले आहे. यातील सर्व ७० गाळ्यांचे बुकींग झाले असून दिड कोटी रूपयांपर्यंत डिपॉझिट जमा झाले आहे.




मुंबईतील जागेच्या तीन ते चार वेळा ३२ कोटी रूपयांना ई-टेंडर करूनही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे दुग्ध डीडीआर यांच्याकडे यामध्ये १० टक्के रक्कम कमी करण्याची विनंती केली होती. ती मान्य केली असुन सदरची जागा २८ कोटी ८६ लाख रूपयांना विकण्यास परवानगी मिळाली आहे. तसेच शेटफळ येथील २ एकर जागा ९४ लाख ६२ हजार रूपये आणि अक्कलकोट येथील ५ एकर जागा १ कोटी ७९ लाख रूपयेला विक्री करण्यास परवानगी मिळाली आहे, अशी माहिती चेअरमन शिंदे यांनी दिली.

### बोर्ड मिटींगमध्ये घेण्यात आलेले निर्णय

आर्थिक मदत करायला गुजरातची एनडीडीबी तयार ▸ दुध संघाच्या जुन्या गाड्या, सर्व स्क्रॅप विकण्यात येणार ▸ दुध संघाच्या इतिहासात प्रथमच सर्व डॉक ऑनलाईन प्रणालीने जोडले ▸ अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात स्वतंत्र डॉक करण्याचे नियोजन ▸ येत्या १० नोव्हेंबर पर्यंत बार्शी येथील पशुखाद्याचा कारखाना सुरू करणार ▸ प्रत्येक संचालकांनी २ हजार लिटर दुध वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत ▸ दुधाच्या प्रतवारीची माहिती ऑनलाईन त्या त्या दुध उत्पादकांना दररोज जाणार.

### २६ संस्थांकडून २० लाख ७० हजार वसूल

पशुखाद्याची व इतर देणी असलेल्यांना नोटीसा बजावल्या. दर महिन्याला १० ते १२ लाख रूपये वसुली होत आहे. आतापर्यंत २६ संस्थांकडून २० लाख ७० हजार रूपये वसूल करण्यात आले आहेत. तरी थकबाकीदार डेअरी व संचालकांनी थकबाकी भरावी, अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे चेअरमन शिंदे यांनी सांगितले.

## शहरातील ओढे-नाले झाले ओव्हरफ्लो...

### देवेंद्र कोठे करणार राज मेमोरियल स्कूल येथे स्थलांतराची सोय

**सोलापूर :** अवंती नगर, वसंत विहार, बाळे नाला हा दुपारपासून ओव्हरफ्लो होऊन याचे पाणी गणेश नगर,आर्यनंदी, यश नगर भाग २ येथे जाण्यास सुरुवात झाली आहे. नागरिकांनी घाबरून जावू नये, ज्या नागरिकांच्या घरामध्ये पाणी जाण्याचे जास्त धोका आहे अशा नागरिकांची सोय सो.म.पाच्या २७ नंबर शाळा राज मेमोरियल इंग्लिश स्कूल येथे करण्यात येईल, असे माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांनी सांगितले.




सोलापूर महानगरपालिकेचे नगर अभियंता संदीप कारंजे, माजी नगरसेवक देवेंद्र कोठे, विभागीय अधिकारी व्यंकटेश चौबे, विभागीय अधिकारी क्रमांक ६ महेश क्षीरसागर साहेब, जे.ई सावंत साहेब, गायधनकर आदींनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळेस देवेंद्र कोठे यांनी सर्व बाबी निदर्शनास आणून दिली. परिसरातील सर्व धोकादायक असलेले रस्ते बॅरिकेटिंगद्वारे बंद करण्यात येत आहेत. नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की मौल्यवान वस्तू कागदपत्र तसेच धान्य अशा सर्व बाबी वरचा मजल्यावर अथवा सुरक्षित स्थळी शक्य असले तर ते हलवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आवश्यक असणाऱ्या नागरिकांना राज मेमोरियल स्कूल येथे राहण्याची व्यवस्था उपलब्ध करून सदर ठिकाणी वॉल कंपाऊंड, जनरेटर, तसेच बाथरूमच इत्यादी व्यवस्था आहे, असे कोठे यांनी सांगितले.

## दिव्यांगांच्या त्या १० कोटींचे केले काय ? ; आडम यांचा सवाल

सुराज्य/सोलापूर

दिव्यांग हे समाजातील वंचित घटक आहे. त्यांना शासनाचा आधार मिळावा म्हणून दिव्यांग व्यक्तींसाठी ५ टक्के राखीव निधीची तरतूद केली असून त्याचा विनियोग दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी करण्याचे निर्देश असून तसे झालेले नाही. वास्तविक १० कोटी निधी शिल्लक आहे. त्यांना किमान ५ हजार रुपये सानुग्रह अनुदान देणे अपेक्षित आहे.

अर्थातच दिव्यांग व्यक्तींच्या त्या १० कोटी चे केले काय आयुक्त साहेब ?असा सवाल ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांनी केला. शुक्रवार दिनांक २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांच्या कार्यालयावर लाल बावटा दिव्यांग श्रमिक संघटना कडून दिव्यांगाना दिवाळी भेट म्हणून ५००० सानुग्रह अनुदान देण्यात यावे ही मागणी घेऊन ज्येष्ठ नेते माजी आमदार आडम मास्तर यांच्या मार्गदर्शनाखाली धरणे आंदोलन करण्यात येणार आले.



आयुक्त पी.शिवशंकर यांनी शिष्टमंडळाला भेटण्यासाठी ५ वाजता ची वेळ दिली परंतु ते आले नाहीत, त्यांच्या भेटीकरिता तब्बल अडीच तास आयुक्त कार्यालय येथे प्रतीक्षा करण्यास भाग पाडले, दिव्यांगाप्रती अनास्था दाखवून त्यांना वेठीस धरणाऱ्या आयुक्तांचा निषेध करण्यात आला. मुख्यमंत्री यांना दिव्यांग सोबत झालेल्या या गंभीर घटनेची हकीकत मांडणार आहोत. दिव्यांगाना उदरनिर्वाह भत्ता, पिवळी शिधापत्रिका, आणि घर मिळण्याबाबत मुख्यमंत्री यांच्याशी शिष्टमंडळाची बैठक लावण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी आयुक्तांनी शिष्टमंडळाशी भेटण्यास व चर्चा करण्यास टाळाटाळ केले व अतिरिक्त आयुक्त, सहा. आयुक्त आदींना शिष्टाई करण्यास पाठवले परंतु आडम मास्तर यांनी त्यांच्याशी बोलणे टाळले. दिव्यांगाची चेष्टा खपवून घेतली जाणार नाही अशा शब्दांत संताप व्यक्त केले. यावेळी ॲड.अनिल वासम, संघटनेचे अध्यक्ष बाबूलाल फनिबंद, सचिव इलियास सिद्दीकी, उपाध्यक्ष आसिफ पठाण,कोषाध्यक्ष अकिल शेख, सहसचिव प्रभाकर कलशेट्टी, इब्राहिम मुल्ला,धनसिंग अंबुवाले, सुशीला गुजले, आशप्पा म्हेत्रे,सुभाष एडके नागेश म्हेत्रे, मोहन कोक्कुल आदी उपस्थित होते.

## माळी वस्ती येथील पुलाची उंची वाढवा : हक्के

**सोलापूर :** बक्षीहिप्परगा (ता.द.सोलापूर) येथील माळी वस्ती येथे पुलाची उंची वाढवणे गरजेचे आहे. शाळकरी मुले, बाजार समितीसाठी येणारे शेतकरी नळ कामगार या सर्वांसाठी हा पूल जीवघेणा ठरला आहे. त्यामुळे पुलाची उंची तात्काळ वाढवावी, अशी मागणी वरळेगांवचे मा.सरपंच तथा रासप नेते श्रीमंत हक्के यांनी केली आहे.



वडजी-वरळेगाव ते सोलापूर या महत्त्वाच्या महामार्गावर दोन मोठे पूल असल्याने या पुलावरून दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाणी जात असते. संबंधित पुलाबाबत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना माहिती दिली असता त्यांनी यादववस्ती येथील पुलाकरिता २.५ कोटी रुपये निधी मंजूर केला आहे.सध्या काम करणे अपेक्षित आहे.परंतु माळी वस्ती येथील देखील पुलाची उंची वाढवणे गरजेचे आहे. सध्या नागरिकांमध्ये त्याच्या मागणीचा जोर धरत आहे. शाळकरी मुले बाजार समितीसाठी येणारे शेतकरी नळ कामगार या सर्वांसाठी हा पूल जीवघेणा ठरला आहे. तरी पुलाची उंची तात्काळ वाढावीवी, असे हक्के यांनी म्हटले आहे. ग्रामस्थांच्या वतीने वडजीचे सरपंच गोटुराम चौगुले, बक्षीहिप्परगाचे सरपंच सिताराम राठोड, राष्ट्रवादीचे किशोर चौधरी, ग्रा.प. सदस्य सखाराम वाघ, रासप जिल्हा उपाध्यक्ष यशवंत सोंडगे, उपाध्यक्ष तानाजी हक्के,राजु भगत, यशवंत गिरी, विनायक पवार, मुकेश चव्हाण यांनीही विनंती केली आहे.

# १९९५ पूर्वीचे महापालिकेचे १३१ रोजंदारी कामगारांना कायम करण्याचा आदेश जारी

## रोजंदारी कामगारांना मिळणार कायमच्या ऑर्डरी

सुराज्य/सोलापूर

**महापालिकेतील १९९५ पूर्वीच्या १३१ रोजंदारी कामगारांना कायम करण्याच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच स्वाक्षरी केली होती. त्यानंतर आज गुरुवारी यासंदर्भात नगर विकास विभागाने निर्णय आदेश जारी केला आहे. उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर यांच्या डिजिटल स्वाक्षरीने हा निर्णय काढण्यात आला असून शासनाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. यामुळे आता या रोजंदारी कामगारांना कायम ऑर्डर लवकरच मिळणार आहेत.**



### मुख्यमंत्र्यांचे मानले आभार



कामगार नेते अशोक जानराव, जेष्ठ कामगार नेते जनार्दन शिंदे, कामगार नेते चांगदेव सोनवणे, सरचिटणीस प्रदीप जोशी आदींसह पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत. कृती समितीच्या माध्यमातून यासाठी पाठपुरावा केला होता. त्याला अखेर यश आले असल्याचे कामगार नेते अशोक जानराव यांनी सांगितले.

महापालिकेतील शेवटच्या टप्प्यातील हे १३१ रोजंदारी कर्मचारी सध्या कार्यरत असून शासनाने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये आकृतीबंधात मंजूर केलेल्या पदावर महापालिकेने प्रस्तावासोबत दिलेल्या यादीतील झाडूवाली ४, बिगारी १२५ व मलेरिया फिल्ड वर्कर २ अशा १३१ रोजंदारी सेवकांना अटी व शर्तीवर कायम नियमित करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला असून त्यास मान्यता देण्यात आली आहे. या शासन निर्णयात म्हटले आहे की, हे रोजंदारी सेवक दिनांक ६ एप्रिल १९९५ पूर्वी सोलापूर महापालिकेत रोजंदारी म्हणून कार्यरत होते. याबाबत महापालिका आयुक्त यांनी अभिलेख तपासून खातरजमा करावी. कर्मचाऱ्यांनी यापूर्वी कायमसवेत घेण्यासाठी दाखल केलेले दावे मागे घेणे आवश्यक आहे.

रोजंदारी कर्मचाऱ्यांची सेवा या शासन निर्णयाच्या दिनांक पासून नियमित करण्यात येत असून त्यांनी यापूर्वी महानगरपालिकेमध्ये केलेली सेवा केवळ त्यांच्या निवृत्तीवेतन व उपदानासाठी ग्राह्य धरण्यात यावी. कर्मचाऱ्यांना त्यांनी यापूर्वी केलेल्या महापालिकेच्या सेवेची कोणतीही थकबाकी महापालिकेकडून अनुज्ञय राहणार नाही. सोलापूर महापालिकेच्या आस्थापनेवरील खर्चाची ३५ टक्केची अट याप्रकरणी विशेष बाब म्हणून शिथिल करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेतील १३१ रोजंदारी कामगारांना सेवेत कायम करण्याचा प्रश्न गेल्या १४ वर्षापासून प्रलंबित होता. महापालिका प्रशासनाकडून याबाबतचा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे पाठवण्यात आला होता. अखेर या प्रस्तावावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल बुधवारी स्वाक्षरी केली होती. याची माहिती आमदार प्रणिती शिंदे यांनी कामगार नेते अशोक जानराव यांना कळवली होती.



भाजप अनुसुचित जाती मोर्चाचे चिटणीस अतलु सरतापे व माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे यांनी वाढदिवसानिमित्त आ. विजयकुमार देशमुख यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.